जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## तोरा मन दपण कहलाये




मन... मनाच्या आरशात तटस्थ व प्रामाणिकपणे पाहिल्यास स्वतःचे गुणदोष दिसू शकतात. भल्या बुऱ्या साऱ्या कर्मांना दाखवणारे मन समजून घेऊ शकलो व त्यावर बऱ्यापैकी नियंत्रण ठेवू शकलो तर आयुष्याचे बरेचसे साफल्य सार्थक होऊ शकते.

मन शुद्ध असले की सब्रकाही शुद्ध असते. या उक्तीचा अर्थ असा आहे की, जेव्हा आपला विवेक शुद्ध असतो, तेव्हा घर (व शरीर) हेच तीर्थस्थान असते. या कारणास्तव 'मन शुद्ध झाले तर गंगा पात्रात असते' असे म्हटले जाते. आपल्या प्रामाणिक मेहनती बरोबरच मनाची निर्मळता खूप महत्त्वाची आहे.

हीच मनाची निर्मळता तुमचं यश बनून समोर येते. मन ही माणसाला निसर्गाने दिलेली मौल्यवान देणगी आहे. माणसाचे यश अपयश हे पूर्णपणे तो एखादी गोष्ट मनापासून करतो की नाही यावरच अवलंबून असते.



मन हो आध्यात्मिक जीवनाचा पायाच आहे. मनाद्वारे एकांतपणा अनुभवणे, ध्यानधारणा करणे, थोडातरी अध्यात्माचा अभ्यास करणे यामुळे विवेक अन् नम्रतेची भावना निमाण होते. संकल्प करणे, निर्णय घेणे यामुळे मनोचेतना अधिक सशक्त होतात व अंतर्मन शुद्ध होते.

चंचल मनाला स्वतःच्याच आरशात पाहून इच्छाशक्तीवर नियंत्रण ठेवणे यासाठी मनात, विचारात अन् एकूणच जीवनात सकारात्मक विचार, इच्छा, कल्पना, अनुभव, संकल्प-विकल्पाचे रंग भरणे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक!

## स्टेशन रोड येथून ३० वर्षीय युवक बेपत्ता

नगर - शहरातील रेल्वेस्टेशन रोडवर अकोलकर वीट भट्टी शेजारी राहणारा सोमनाथ रावसाहेब शिंदे (वय ३०) हा तरुण दि.२ डिसेंबर पासून घरातून बेपत्ता झाला आहे.

त्याच्या घरच्यांनी त्याचा नगर शहरात, त्याच्या मित्रांकडे तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता तो कोठे ही मिळून आला नाही. त्यामुळे त्याची आई ताराबाई शिंदे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात मुलगा हरविल्याची तक्रार दिली असून त्यावरून कोतवाली पोलिसांनी हरवल्याची नोंद केली. बेपत्ता झालेल्या सोमनाथची उंची ६ फुट, शरीरबांधा मध्यम, रंग गोरा, नाक सरळ, डोळे तरतरीत, अंगात पांढऱ्या रंगाचा टीशर्ट, काळ्या रंगाचे जर्किन तसेच काळपट रंगाची पॅंट घातलेली असून त्याच्या बाबत काही माहिती मिळाल्यास कोतवाली पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शाळा, कॉलेज खाजगी क्लासेसचे फायर ऑडिट करा, विद्यार्थी सुरक्षित नाही; आग लागल्यास जबाबदार कोण

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्व शहरातील शाळा, कॉलेज खाजगी क्लासेसचे फायर ऑडिट करावे, अशी मागणी नितीन भुतारे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

राज्य सरकार तसेच सर्वो च्च न्यायालयाने सन २००६ तसेच २००९ च्या आदेशानुसार सर्व सरकारी, खाजगी शाळा, कॉलेज, क्लासेस यांच्या इमारतीमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा साधने बसुन घेणे तसेच या सर्व इमारतींचे फायर ऑडिट करून घेण्याचे आदेश दिले होते. परंतु अहिल्यानगर शहरातील जवळपास सर्वच शाळा, कॉलेज खाजगी क्लासेसमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा साधने दिसत नाही या इमारतींचे फायर ऑडिट झालेले दिसत नाही. त्यामुळे हजारो, लाखो रुपये फी गोळा करणाऱ्या या शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत काळजी घेत नाही, असे नितीन भुतारे म्हणाले. तसेच महानगरपालिका आयुक्त या प्रकरणात गांभीर्य दाखवत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

विद्यार्थ्यांची सुरक्षा ही महानगरपालिका तसेच संबंधित शाळा, कॉलेज खाजगी क्लासेस इत्यादी संस्थांची आहे. त्यामुळे आयुक्तांनी या विषयात लक्ष घालून विद्यार्थी सुरक्षित राहतील यासाठी सर्व शाळा, कॉलेज, खाजगी क्लासेसचे फायर ऑडिट करून घ्यावे अशी मागणी भुतारे यांनी केली आहे. या मागील काळात १ एप्रिल २००८ रोजी याबाबत निवेदन देऊन महापालिकेने संबंधित शाळा, कॉलेज, खाजगी क्लासेसला फक्त नोटीस बजावण्याचे काम केले पण आग प्रतिबंधक यंत्रणा, साधने बसविण्यात आली नाही कुठेही संस्थेचे फायर ऑडिट झालेले नाही.

आग लागल्यावर महानगरपालिका प्रशासन जागे होते व नंतर या सर्व प्रक्रिया पार पाडतात त्यामुळे आयुक्त यांनी दखल घ्यावी व शहरातील शाळा, कॉलेज, खाजगी क्लासेस यांच्या इमारतींचे फायर ऑडिट करून घ्यावे तसेच आग लागल्याच्या घटना घडल्या तर त्यास आयुक्त जबाबदार राहतील असा इशारा भुतारे यांनी दिला आहे.

## माजी सैनिकांच्या समस्या निराकरणासाठी नगरमध्ये २२ डिसेंबर रोजी मेळावा

नगर - माजी सैनिकांच्या पेन्शन ईसीएचएस, सीएसडी कँटीन, स्पर्श याबाबतच्या अडी-अडचणींचे निराकरण करण्यासाठी २२ डिसेंबर रोजी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

जिल्ह्यातील युद्ध विधवा, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिक विधवा व माजी सैनिकांनी त्यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी अर्जाच्या दोन प्रती व सर्व सैन्य कागदपत्रांसमवेत आर्मड पोलो ग्राऊंड, अहिल्यानगर येथे उपस्थित रहावे, असेही कळविण्यात आले आहे.

## देशातील संपूर्ण निवडणुका बॅलेट पेपरवरच घ्याव्यात

### ईव्हीएमवर संशय, मारकडवाडी गावच्या चावडीवर लोकशाही संरक्षण कायद्याचा मसुदा ठेवला जाणार

नगर - पीपल्स हेल्पलाईन आणि वकील संघटनांच्या पुढाकाराने माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावच्या चावडीवर लोकशाही संरक्षण कायद्याचा मसुदा ठेऊन लोकशाही वाचविण्यासाठी त्याचे पूजन केले जाणार आहे. तर त्या मसुद्यावर तमाम ग्रामस्थांच्या सहभागातून लोकशाही राष्ट्रीय चक्र वाहण्यात येणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.




लोकशाहीमध्ये देशाची अंतिम सत्ता जनतेच्या हातात असते. भारतात संसदीय लोकशाही राबवली जाते, अशा वेळेस निवडून द्यायच्या व्यक्तीला दिलेले मत नक्की पोहोचले पाहिजे. यासाठी मतदारांच्या मनात काही एक शंका असता कामा नये. त्यामुळे देशातील लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये बॅलेट पेपरच्या माध्यमातूनच निवडणुका ईव्हीएम मशीनवर नागरिकांमध्ये संशय निर्माण झाला असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांबाबत देशातील तमाम जनतेला चिंता लागली आहे. ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक घोटाळा करता येतो आणि मतदानाच्या प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करता येतो का? या संदर्भात नागरिकांमध्ये संशय निर्माण होऊन चर्चा रंगली आहे. लोकशाहीत सर्वश्रेष्ठ मतदानाचा अधिकार असून, मतदारांना याबाबत संशय राहता कामा नये. बॅलेट पेपरच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासाठीचा खर्च अतिशय जुजबी आहे. जगभरातील अतिप्रगत जर्मन, जपान व इतर देशांमध्ये बॅलेट पेपरच्या माध्यमातून निवडणुका घेतल्या जातात. लोकांच्या मनातील शंका संपविण्यासाठी बॅलेटपेपर शिवाय पर्याय नसल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

लोकशाही संरक्षण कायद्याद्वारे लोकांच्या विश्वासाला पात्र होण्यासाठी देशातील निवडणुका बॅलेट पेपरवर घेतल्या जाव्या! अशी तरतूद लोकशाही संरक्षण कायद्याच्या मसुद्यात ठेवण्यात आली आहे. देशाचे पंतप्रधान व त्यांचे मंत्री निवडणूक आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य आपल्या सोयीसाठी नेमणार असेल, तर देशातील जनतेला या बाबींमध्ये संशय निर्माण होणार आहे. देशातील निवडणुका आणि निवडणूक आयोग निपक्षपाती होण्यासाठी लोकशाही संरक्षण कायद्याच्या मसुद्यामध्ये निवडणूक आयोग भारताचे सरन्यायाधीशांच्या सहभागाच्या सल्लयातून नेमला जावा, असा आग्रह संघटनेने धरला असल्याचे अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

लोकशाही संरक्षण कायद्यामुळे देशात कोणीही हुकूमशाही आणि हम करे सो कायदा आणू शकणार नाही? देशाच्या स्वातंत्र्यासाठी लाखो लोकांनी बलिदान दिले, त्याची जाणीव राज्यकर्त्यांना असली पाहिजे. देशांमध्ये मतदार अक्कलमारीला अजिबात थारा असता कामा नये, म्हणून मारकडवाडी भारतातील लोकशाही संरक्षणाचे केंद्र झालेले आहे. या ठिकाणी लोकशाही राष्ट्रीय लोकशाही संरक्षण कायद्याच्या मसुद्यावर सत्याग्रहींची नोंद पीपल्स हेल्पलानाईच्या पुढाकाराने करण्यात येत असल्याचे म्हंटले आहे.

## खा. नीलेश लंके यांच्याकडून हिंदूवरील अत्याचाराचा निषेध

### जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांना निवेदन



नगर - बांगलादेशमधील हिंदूवर गेल्या काही दिवसांपासून अत्याचार सुरू असून सनातन धर्माविरूध्दच्या कथित कटाचा भाग म्हणून जाणीवपुर्वक मंदिरे आणि हिंदूंना लक्ष्य केले जात असल्याचे नमुद करून खा. नीलेश लंके यांनी हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध केला आहे. तसे निवेदन खा. लंके यांच्यावतीने जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ यांना देण्यात आले आहे.

यासंदर्भातील निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, बांगलादेशातील हिदू धर्मीयांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार सुरू असून काही दिवसांपासून हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. बांगलादेशातील अध्यात्मिक गुरू चिन्मय कृष्णदास यांना नुकतीच अटक करून त्यांना तुरूंगात डांबण्यात आले आहे. बांगलादेशमध्ये मानवतेच्या मर्यादा ओलांडल्या जात आहेत. जगामध्ये कोठेही हिंदू धर्मीय किंवा अल्पसंख्यांक धर्मीयांवर होणारा अत्याचार हा अत्यंत चुकीचा असून मानवता धर्म जोपासण्यासाठी महाराष्ट्र व भारत सरकारने यासाठी तातडीने पावले उचलून बांगलादेशमधील हिंदू धर्मीयांना दिलासा द्यावा अशी मागणी सर्व स्तरांवरून होत असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

हिंदू धर्माने समस्त जगाला मानवतेचा धर्म शिकविला आहे. अत्यंत सहिष्णू असणाऱ्या हिंदू धर्माबाबत बांगलादेशमध्ये मात्र कट्टरतावादी धार्मिक व्देषभावना निर्माण करून तेथील स्थानिक हिंदूंचा छळ करत असून त्याचा आम्ही तीव्र निषेध करीत असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

## चासजवळ कारची दुभाजकाला धडक नगरमधील तरुणीचा दुर्दैवी मृत्यू

### चालक गंभीर जखमी, नगर - पुणे महामार्गावर चास जवळील घटना



नगर - पुणे महामार्गावर चास गावाजवळ अपघातग्रस्त झालेली कार.

नगर - भरधाव वेगातील कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार पुलाच्या कठड्याला व नंतर रस्ता दुभाजकाला धडकून पलटी झाली. या अपघातात २१ वर्षीय विवाहित तरुणीचा मृत्यू झाला असून कार चालकही गंभीर जखमी झाला आहे. नगर - पुणे महामार्गावर चास गावाजवळ हा अपघात झाला.

या अपघातात स्नेहल तेजस बरशिले (रा. जवळा, ता.पारनेर) या विवाहितेचा मृत्यू झाला असून कार चालक शुभम नागेश खोमणे (रा. म्हसे खुर्द, ता. पारनेर) हा जखमी झालेला आहे. याबाबत मयत स्नेहल चा पती तेजस सुभाष बरशिले (रा.जवळा, ता.पारनेर) यांनी सोमवारी (दि.९) रात्री नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून कार चालक शुभम खोमणे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बरशिले कुटुंबीय दि.५ डिसेंबर रोजी सकाळी ६.३० च्या सुमारास त्यांच्या निसान कंपनीच्या मॅगनेट कारने (क्र.एमएच१२ डब्लू झेड ७४२८) बाहेरगावी चाललेले होते. सुप्याकडून नगरच्या दिशेने येत असताना चास गावाजवळील पुलावर कार चालक शुभम खोमणे याचे कारवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे कार पुलाच्या कठड्याला व नंतर रस्ता दुभाजकाला धडकून पलटी झाली. या अपघातात स्नेहल बरशिले यांचा मृत्यू झाला तर कारचालक शुभम जखमी झाला आहे. पोलिसांनी कारचालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पो.हे.कॉ.खंडेराव शिंदे हे करीत आहेत.

## घरासमोरून दुचाकीची चोरी

नगर - निंबोडी गावच्या शिवारात खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर माळी यांच्या घरासमोर हॅंडेल लॉक करून लावलेली हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर प्रो मोटारसायकल (क्र. एम एच १६ ए क्यू ८०२३) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅंडेल लॉक तोडून चोरून नेली.

याप्रकरणी अ‍ॅड. उद्धव नारायण अल्हाडे (वय ४९, रा. हरिकृष्ण नगर, दरेवाडी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## झेंडीगेट येथील आणखी दोन कत्तलखान्यावर पोलिसांची कारवाई; दोन जनावरांची सुटका

नगर - नगर शहरात सुरु असलेल्या कत्तलखान्यांवर पोलिसांनी रविवारपाठोपाठ सोमवारीही (दि.९) कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने झेंडीगेट परिसरातील एका कत्तलखान्यावर कारवाई करत ४१२० किलो गोमांस जप्त केले तर दुसऱ्या ठिकाणी कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या २ गायींची सुटका केली आहे. दोन्ही ठिकाणी मिळून १३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून ७ जणांच्या विरुद्ध २ वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांनी तपास पथकातील स.पो.नि. हेमंत थोरात, पोलिस उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलीस अंमलदार विश्वास बेरड, गणेश लोंढे, अतुल लोटके, पंकज व्यवहारे, संदीप दरंदले, सोमनाथ झांबरे, शिवाजी ढाकणे, रोहित मिसाळ, प्रमोद जाधव व महादेव भांड अशांचे दोन पथक तयार करुन पथकास अवैध गोमांस व्यावसायिकांची माहिती काढुन कारवाईच्या सुचना दिल्या होत्या.

या पथकाने सोमवारी सायंकाळी ५ च्या सुमारास झेंडीगेट, शाळा क्र.४ चे पाठीमागे छापा टाकून कत्तल करण्याच्या उद्देशाने डांबुन ठेवलेल्या ६५ हजार रुपये किंमतीच्या २ गायींची सुटका केली. सदर गायी या हाफीज जलील कुरेशी, गुफरान हाफीज कुरेशी, अल्ताफ खलील कुरेशी (सर्व रा.झेंडीगेट) यांनी डांबून ठेवल्याचे समोर आले. त्यामुळे त्या तिघांच्या विरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५ (अ)(ब) (क) ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यानंतर या पथकाला माहिती मिळाली की, आंबेडकर चौक, झेंडीगेट येथे अरबाज गुलामरसुल कुरेशी हा त्याचे साथीदारासह बंदीस्त जागेत गोवंशीय जातीचे जनावरांची कत्तल करत आहे, या मिळालेल्या माहितीवरून पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला असता तेथे बंदीस्त जागेमध्ये २ इसम गोवंश जनावरांची कत्तल करताना मिळून आले. रफीकउल इस्लाम जमालुद्दीन इस्लाम (वय १९, रा.कारी मस्जीद, झेंडीगेट), हानसेन हारून कुरेशी (वय २०, रा.झेंडीगेट) अशी त्यांची नावे आहेत. त्या ठिकाणी पथकाने १२ लाख ३६ हजार रुपये किंमतीचे ४१२० किलो गोमांस, २०० रुपये किंमतीचा लोखंडी सुरा असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. ताब्यातील आरोपीकडे जप्त मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता त्यांनी अरबाज गुलामरसुल कुरेशी, शादाब गुलामरसुल कुरेशी (दोन्ही रा.कुरेशी मस्जीदजवळ, व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) यांच्या सांगण्यावरून जनावरांची कत्तल केली असल्याची माहिती सांगितली आहे. त्यामुळे या ४ आरोपीविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५ (अ) (ब) (क) ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दत्तात्रय भूतकर यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - भूतकरवाडी येथील रहिवासी दत्तात्रय दगडू भूतकर



(वय ८०) यांचे ८ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हेमंत भूतकर, विनायक भूतकर यांचे ते वडील होत.

## गोविंद शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील गोविंद किसन शिंदे (वय ८६) यांचे



वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ, दोन बहिणी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भाजीपाला विक्रेते भास्कर शिंदे व संदिप शिंदे यांचे वडील, रावसाहेब व चंद्रकांत शिंदे यांचे थोरले बंधू, मधुकर, शंकर व भाऊसाहेब शिंदे यांचे चुलते होत.

## जितेंद्र परदेशी यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील जितेंद्र वसंत परदेशी (वय ५२) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे, जावई असा परिवार आहे. मनोज (मुन्ना) परदेशी यांचे थोरले बंधू, चि.ओम परदेशी यांचे वडील होत.

## नालेगावात मामासोबतच्या वादातून भाच्यावर केले चॉपर व तलवारीने वार

### तिघांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा

नगर - मामाबरोबर असलेले जुने भांडण व वादाचा मनात राग धरून त्यांच्या भाच्यावर तिघांनी चॉपर व तलवारीने वार करुन, लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन त्यास ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना नालेगाव परिसरातील टांगे गल्ली, अमरधाम चौक येथे सोमवारी (दि.९) सायंकाळी घडली. चेतन रविद्र निंदाणे (वय २६, रा कोर्ट गल्ली रोङ,कोपरगाव) असे हल्लयात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.

जखमी चेतन याच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असून त्याने उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी जितु सुरेश चव्हाण (वय ४५), रोहन जय चव्हाण (वय २५), दाद्या उर्फ सुनिल जाधव (वय २७, सर्व रा मुन्सीपल कॉलनी नालेगाव,अ.नगर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींचे चेतन याचे मामा लक्ष्मण अर्जुन सारसर (वय ४५, रा मुन्सीपल कॉलनी, नालेगाव) यांच्याशी गोगादेव मंदिरावरुन भांडण व जुने वाद आहेत. त्या वादातून हा हल्ला झाल्याचे चेतन याने जबाबात म्हंटले आहे.

जखमी चेतन याच्या मावशीच्या मुलीचे १२ डिसेंबर रोजी लग्न आहे. त्यामुळे तो दि. ७ डिसेंबरला कोपरगाव येथून नगरला आलेला आहे. त्याची मावशी व मामा हे एकाच गल्लीत राहत असल्याने तो त्यांच्या कडे राहात होता. सोमवारी (दि.९) सायंकाळी ६ च्या सुमारास तो नालेगाव येथील टांगे गल्ली येथे असताना मारुती मंदिराजवळ तिघा आरोपींनी त्याला गाठले, त्यावेळी रोहन चव्हाण याने चेतन याच्या मानेवर चॉपरने वार केला असता तो त्याने चुकविला.परंतु तो वार त्याच्या डाव्या हाताच्या दंडावर झाला. रोहन चव्हाण हा जिंवत मारण्याची धमकी देत होता. त्यावेळी चेतन पळत असताना जितु चव्हाण याने त्याच्या मानेवर तलवारीचा वार करण्यास तलवार उचलली असताना तो वार चेतन याने खाली वाकुन पळत वार चुकविण्याचा प्रयत्न केला.

परंतु तो वार त्याच्या पाठीवर लागला व त्याचा त्याचा साथीदार दाद्या उर्फ सुनिल जाधव याने चेतन यास शिवीगाळ दमदाटी केली. व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्या तिघांनी मिळुन त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी चेतन हा जीव वाचविण्यासाठी पळत असताना त्याला किरण जरे (रा.काटवन खंडोबारोङ, जाधव मळा अ.नगर) हा तेथे जाताना दिसला म्हणुन त्याने त्यास आवाज दिला व तेथील लोक आरडाओरडा ऐकुन जमा झाले. त्यामुळे मारणारे तेथुन पळुन गेले. त्यानंतर किरण जरे याने चेतन यास उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी चेतन निंदाणे याने दिलेल्या जबाबावरून तिघांविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## केडगाव येथे जुन्या वादातून चौघांकडून तरुणास मारहाण

नगर - जुन्या वादाचा मनात राग धरून चौघांनी तरुणाला शिवीगाळ दमदाटी करीत लाकडी दांडग्याने व लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना केडगाव येथील अंबिका हॉटेल मागे असलेल्या हरिजन वस्ती येथे घडली.

याबाबतची माहिती अशी की रुपेश बबन कांबळे (वय ३५, रा. अंबिका हॉटेल मागे, हरिजन वस्ती केडगाव) याचे शनिवारी (दि.७) दुपारी आकाश पवार (पूर्ण नाव माहित नाही रा. केडगाव) याच्याशी भांडण झाले होते त्या भांडणाचा मनात राग धरून आकाश पवार हा त्याच्या तीन साथीदारासह रविवारी (दि.८) सायंकाळी कांबळे यांच्या घरासमोर गेला आणि मोठमोठ्याने शिवीगाळ करत धमकी दिली यावर रुपेश कांबळे हा बाहेर आला असता आकाश पवार याने रुपेश याच्या शर्टची कॉलर धरून त्याच्या डाव्या गालावर मारहाण केली व तू माजलास का माझ्या सोबत वाद घालतोय का ? असे म्हणतात त्याच्या एका साथीदारांने लाकडी दांडक्याने मारहाण केली. अन्य तिघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. व परत माझ्यासोबत वाद घातला तर जीवे ठार मारून टाकेल अशी धमकी दिली. त्यावेळी रुपेशाने मोठ्याने आरडाओरडा केला असता त्याचे वडील, पत्नी, चुलती व तेथील स्थानिक लोक देखील भांडण सोडवण्याकरिता मध्ये आले. तेव्हा आकाश पवार व त्याच्यासोबत असलेले तीन अनोळखी तरुण त्या ठिकाणाहून त्यांनी आणलेल्या बुलेट व क्सेस मोपेड गाडीवरून निघून गेले.

या मारहाणीत रुपेश याच्या डाव्या बाजूचे बरगडी, डोके व पायाला मार लागून हाताच्या कोपराखाली मोठी जखम झाली.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी रुपेश कांबळे यांनी दिलेले फिर्यादीवरून आकाश पवार व त्याच्या तीन साथीदार विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आत्मविश्वास वाढविण्यासाठी

उत्कटासन केल्याने तुमचे शरीर अधिक ऊर्जावान बनते आणि तुमचे मन शांत होते. हे आसन तुमचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करते कारण ते तुम्हाला स्वतःला आव्हान देण्यास प्रवृत्त करते. त्याचप्रमाणे सूर्यनमस्कारही करावेत.

## पाककला

### टोमॅटो सूप

**साहित्य :** ४ टोमॅटो, १/२ चमचा साखर, १ चमचा लोणी, १/२ चमचा काळे मिरे पूड, ५ ब्रेड क्यूब्स, १/२ चमचा काळे मीठ, १ चमचा साय/ताजे क्रीम, १ चमचा हिरवी कोथिंबीर, चवीनुसार मीठ

**कृती :** टोमॅटो स्वच्छ धुवून घ्यावे. आता या टोमॅटोचे मोठे तुकडे करावे. आता एका भांड्यात दोन कप पाणी घालून मंद आचेवर गरम करण्यासाठी ठेवा. आता त्यात चिरलेला टोमॅटो घालावा. टोमॅटो शिजवून घ्यावा. टोमॅटो चांगले शिजून मऊ झाल्यावर गॅस बंद करा.

आता टोमॅटो बाहेर काढून सोलून घ्यावे. यानंतर टोमॅटोचे सर्व तुकडे बारीक करून घ्यावे. यानंतर टोमॅटोचा लगदा एका मोठ्या चाळणीतून गाळून त्याच्या बिया वेगळ्या कराव्या. सूप घट्ट वाटल्यास आवश्यकतेनुसार पाणी घालून पातळ करावे. यानंतर गॅसवर मध्यम आचेवर उकळण्यासाठी ठेवावे. सूपला उकळी आली की त्यात लोणी, काळे मीठ, साखर, मिरे पूड आणि चवीनुसार मीठ घालावे. आता पाच मिनिटे शिजवा. यानंतर गॅस बंद करावा. त्यात ब्रेड क्यूब्स आणि हिरवी कोथिंबीर घालून सर्व्ह करावे.

## वास्तू

### घराचा दरवाजा व गणेशमूर्ती

वास्तुशास्त्रानुसार घराच्या मुख्य दरवाजावर गणेशाची मूर्ती ठेवण्याची दिशा लक्षात ठेवावी. यासाठी तुमच्या घराचा मुख्य दरवाजा उत्तर किंवा दक्षिण दिशेला असावा. पण लक्षात ठेवा दरवाजा पूर्वेकडे किंवा पश्चिमेला असेल तर तिथे गणेशमूर्तीची स्थापना करू नये.

## सल्ला

लोखंडाचा तवा अगर कढई घासून झाल्यावर ती स्वच्छ पुसून, त्याला तेलाचा हात लावून ठेवल्यास गंज चढणार नाही.

## सौंदर्य

मुलांच्या आहारात रोज कमीत कमी १ चमचा गाईचे तुप दिल्यास अकाली केस पांढरे होण्याची समस्या दूर होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ११ डिसेंबर २०२४

**मोक्षदा एकादशी, गीतांजयंती, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, रेवती ११।४८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. आपले काम धाडसाने कराल.

**वृषभ** : एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते.

**मिथुन** : अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील. प्रवासाचे योग संभवतात.

**कर्क** : संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल.

**सिंह** : आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. आरोग्य उत्तम राहील.

**कन्या** : नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. लांबचे प्रवास टाळा. जुन्या सहकाऱ्यांच्या गाठी-भेटी होतील.

**तूळ** : अपेक्षेनुसार कार्ये होतील. आरोग्य उत्तम राहील. मित्रांपासून, सहकाऱ्यांपासून लाभ मिळेल.

**वृश्चिक** : व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. इच्छित कार्य थोड्या उशीरा होतील. कामात पूर्ण समर्पणभाव ठेवाल.

**धनु** : अनपेक्षित खर्च होण्याची शक्यता. महत्वाच्या व्यक्तींशी संपर्क येईल. सामाजिक स्थितीत सुधारणा होईल.

**मकर** : अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

**कुंभ** : नवीन कामे, योजना लाभदायक ठरतील. अडकलेली कामे आपल्या प्रयत्नांमुळे पूर्ण होतील. आरोग्य नरम-गरम राहील.

**मीन** : महत्त्वाच्या कामांमध्ये आपणास घरच्यांचा पाठींबा मिळेल. आपण ठरावीक वेळेत काम पूर्ण कराल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**स्मिता** - वजन कसे कमी करू? **डॉक्टर** - मान डावीकडे-उजवीकडे-डावीकडे फिरवायची.
**स्मिता** - कधी? ठरावीक वेळ? **डॉक्टर** - कोणी खायला विचारल्यावर.

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* कोणत्या देशाने प्रथम घोड्यास उपयोगात आणले? - कझाकिस्तान
* आशियातील सर्वात मोठा देश कोणता? - रशिया
* आशियातील कोणत्या देशामध्ये सर्वात उंच पर्वत स्थित आहे? - माऊंटएव्हरेस्ट (नेपाळच्या उत्तरेस)
* इरावडी त्रिभूत्र प्रदेश कोणत्या देशास लाभला आहे? - म्यानमार

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६८ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ■ |
| ७ | | ■ | ८ | | | | ■ |
| ९ | | | ■ | ■ | | ■ | १० |
| ११ | | ■ | १२ | १३ | | १४ | |
| ■ | १५ | १६ | ■ | | ■ | १७ | |
| १८ | | | १९ | ■ | ■ | | ■ |
| | ■ | ■ | | ■ | २० | | २१ |
| २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |

**आडवे शब्द :-** १) त्या त्या वेळप्रसंगानुसार योग्य सुचते ते ७) पूर्वीच्या काळातील एक चलन ८) माणसांतील श्रेष्ठ ९) विजयादशमी ११) अरबी देव १२) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव १५) हक्क; शत्रुत्व; फिर्याद; दुष्मनी १७) माळ; हार १८) सोडचिठ्ठी; घटस्फोट; काडीमोड २०) माळ; हार सिरियल (टीव्हीवरील वगैरे) २२) पैसा; आडका २३) पायाने केलेला प्रहार २४) श्रीरामाच्या वानरसेनेतील दोन प्रमुख वानरांपैकी एक

**उभे शब्द :-** १) सख्खा भाऊ २) मनसब धारण करणारा ३) पुत्राची पत्नी; स्नुषा ४) चल; खंदक; हाळ ५) फटीतून येणारा प्रकाशकिरण ६) धातूचा दोरा १०) स्त्री; शक्तिहीन १३) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ १४) 'ड्रीम गर्ल' म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री १६) धागा; तंतू; दोरा; सूत १८) लाभ; नफा १९) घोडशाळा २१) समय; वेळ; कालावधी; मृत्यू

### शब्दगंध क्र. ७०६७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | म | स्त | ■ | खे | प | ■ | घा |
| का | त | र | वे | ळ | ■ | दा | ट |
| म | ल | ■ | स | क | ला | द | ■ |
| ■ | ब | स | क | र | ■ | ला | ध |
| अ | ■ | पा | र | ■ | मुं | ■ | ब |
| प | हा | ट | ■ | भ | गी | र | थ |
| वा | ट | ■ | पा | वा | ■ | वा | या |
| द | ■ | अ | व | नी | ■ | ना | ट |

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आयुष्यातील प्रत्येक अडथळा हा यशाच्या मार्गावरील एक पायरी आहे; तो ओलांडल्याशिवाय पुढे जाता येत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मानसिक भूक आणि वास्तविक भूक यातील फरक कसा ओळखायचा?

अन्न ही आपल्या शरीराची गरज आहे परंतु कधीकधी आपल्याला खरोखर भूक लागली आहे की मानसिक भूक आहे हे समजणे कठीण आहे. मानसिक भूक ही अशी स्थिती आहे जेव्हा आपल्याला शारीरिक गरजेशिवाय अन्न खाण्याची इच्छा जाणवते. हे बऱ्याचदा तणाव, चिंता, भावनिक बदल किंवा सवयींमुळे होते. एखादी विशिष्ट गोष्ट खाण्याची अचानक इच्छा जाणवणे, टीव्ही पाहताना किंवा कंटाळा आल्याने काहीही खाण्याची इच्छा होणे. भावनिक स्थितीत खाणे, जसे की तणावाखाली किंवा आनंदात खाणे.

खरी भूक तेव्हा असते जेव्हा तुमच्या शरीराला खरोखरच अन्नाची गरज असते. हे पोटात थोडासा खडखडाट किंवा रिकामपणाची भावना द्वारे दर्शविले जाऊ शकते. हळूहळू भूक लागते. पोटात हलके दुखणे किंवा गड़गड़ाहट झाल्याची भावना होणे. अन्नाच्या गरजेनुसार संतुलित आहाराची इच्छा होणे. मानसिक भूक अचानक लागते आणि अनेकदा अनहेल्दी पदार्थांची लालसा निर्माण होते.

वास्तविक भूक हळूहळू वाढते आणि शरीराला ऊर्जा देणारे अन्न आवश्यक असते. योग आणि ध्यान करा, योग आणि ध्यानामुळे तणाव कमी होतो आणि शरीराच्या गरजा समजण्यास मदत होते. जर तुम्हाला अचानक भूक लागली असेल तर पाणी पिण्याचा प्रयत्न करा, काहीवेळा ते तहानचे लक्षण देखील असू शकते. तसेच जास्त खाणे टाळण्यासाठी संतुलित आहार घ्या आणि खाण्याच्या सवयी सुधारा.

रोजच्या व्यायामाने तंदुरुस्ती तर राहतेच शिवाय मानसिक भूकही नियंत्रित राहते. मानसिक आणि वास्तविक भूक यातील फरक समजून घेणे फार महत्वाचे आहे. योग्य ओळख करून, तुम्ही जास्त खाणे टाळू शकता आणि तुमचे आरोग्य सुधारू शकता. योग, ध्यान आणि संतुलित आहाराच्या मदतीने मानसिक भूक नियंत्रित करणे सोपे आहे.

## माकड आणि घंटा

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एके दिवशी एका चोराने गावातील मंदिराची घंटा चोरली. घंटा चोरल्यानंतर तो जंगलाच्या दिशेने धावत सुटला. एक गुहेमध्ये अराम करीत असलेल्या वाघाने त्या घंटेचा आवाज ऐकला व त्याला तो आवाज खूप आवडला. लवकरच त्याने चोर आणि घंटेला शोधून काढले. वाघाने चोरावर हल्ला केला आणि त्याला ठार केले. घंटा जमिनीवर पडली व वाघ आपली शिकार खाण्यात दंग झाला.

काही दिवसानंतर तिथून एक माकडांची टोळी जात होती. त्यांनी घंटेला पहिले व त्यांना घंटा फारच आवडली. माकड ती घंटा घेऊन खेळू लागले. ते दिवसभर फिरायचे व रात्री घंटा सोबत खेळायचे.

गावातली लोक रोज रात्री येणाऱ्या घंटेचा आवाज ऐकून घाबरत होती. गावातील लोकांना चोराचा मृतदेह सापडल्याने ही बातमी पसरली की, जंगलात कोणीतरी राक्षस राहत आहे. जो लोकांना ठार केल्यानंतर घंटा वाजवतो. लवकरच गावामध्ये ही अफवा पसरली व लोक गाव सोडून पळून जायला लागले. त्या गावामध्ये एक आजीबाई राहायची तिला या गोष्टीवर विश्वास न्हवता. ती खूप धाडसी आणि शूर होती. तिने एक दिवस ठरवले की, मी या घंटेचा आवाजाचा मागोवा घेईल. व शोधून काढेल की, यामागचे नक्की कारण काय आहे.

एक दिवस आजीबाई गावातील संरपंचांना म्हणाली की, सरपंच मला विश्वास आहे की, गावात गणेशपूजा केल्यास हा आवाज नक्कीच बंद होईल. पण याकरिता काही पैशांची आवश्यकता आहे. सरपंचानी पूजेकरिता पैसे दिले.

चतुर आजीबाईने फळे आणि मेवे विकत घेऊन गावातील मंदिरामध्ये पूजा केली. पूजा झाल्यानंतर आजीबाई सर्व साहित्य घेऊन जंगलाच्या दिशेने गेली. तिने त्या जागी सर्व सामान नेऊन ठेवले जिथून रोज रात्री घंटेचा आवाज यायचा व ती एका झुडपा मागे लपून बसली.

आता रात्री सर्व माकडे परतली आणि त्यांची दृष्टी तिथे ठेवलेल्या फळांवर पडली त्यांनी हातातील घंटा खाली ठेवली व फळे खाण्यास सुरवात केली. त्याचवेळी चतुर आजीबाईने ती घंटा उचलली आणि पळत गावाच्या दिशेने आली व सर्व गावाला आणि सरपंचांना घडलेली कहाणी सांगितली. व ती घंटा दाखवली. गावातील लोकांनी आजीबाईच्या धाडसीपणाचे कौतुक केले व आभार मानले. कारण आजीबाईच्या तिच्या शूरपणामुळे सर्व गावकऱ्यांची भीती दूर केली.

तात्पर्य : कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवण्यापूर्वी आधी विचार करावा.

## रहमते दर्शन (भाग - १)



जहाँ उनका संग्रह, 'मताए नूर' ग़ज़लिया लहजे में है, वहीं 'जादए नूर' में सूफियाना या संत साहित्य का रंग है, फिर भी दोनों के बुनियादी आध्यात्मिक रिश्ते में कोई अन्तर नहीं है। संत जी ने अपने निबंध, मेरा नज़रिए शायरी में अपने विचार को यूँ पेश किया है।

मेरा नज़रिया (दृष्टिकोण) शायरी का केवल दिमाग़ या चिन्तन और अध्ययन की उपज नहीं, वह मेरी ज़िन्दगी से है और वह मेरे व्यक्तित्व और जीवन तक सीमित नहीं, वरन हमारे चारों ओर इंसानी ज़िन्दगी का जो तटहीन समुन्द्र बह रहा है, उससे जुड़ा हुआ है। आरम्भ में दर्शन जी परम्परागत तरीके से शेर कहते थे। सूफीवाद उनका ख़ास रंग था। इस मंज़िल की तरफ उनके छात्र जीवन की उस रचना या ग़ज़ल में निशानदेही मिलती है जो उन्होंने अपने

### प्रस्तावना

पिता पूज्य की याचना पर कही थी। उस प्रारम्भिक जीवन में ही दर्शन कहाँ पहुँच गये थे, इसका अन्दाजा इस गजल से होता है। दर्शन जी उस समय गवर्नमेंट कॉलेज, लाहौर में एफ. ए. के छात्र थे और कॉलेज के बाहर साहित्यिक समारोहों में अपना स्थान बना चुके थे। संत कृपालसिंह जी ने उनकी ग़ज़लें कॉलेज की मशहूर मासिक पत्रिका, 'रावी' में पढ़ी और रेडियो के एक मुशायरे में पढ़ते हुए भी सुना। एक दिन उन्होंने इस उभरते हुए सूरज से कहा था, दर्शी, तुम शे'र अच्छा कह लेते हो। परम संत बाबा सावनसिंह जी के जन्म दिन के अवसर पर एक गजल उनकी शान में भी कह दो। दर्शन जी ने ग़ज़ल कही। संत सतुरु ने दिल खोल कर तारीफ की। कुछ शेर देखिये,

ख़ुदा का नूर मुर्शिद में भला मालूम होता है।
ये आईना है वह जिसमें ख़ुदा मालूम होता है।। रूखे मुर्शिद में वह नूर सफ़ा मालूम होता है। कि मुर्शिद ही बनफ्से ख़ुद ख़ुदा मालूम होता है ।। हर इक क़तरा दिखाता है जियाये मुर्शिदे कामिल। हर इक ज़र्रा मुझे मुर्शिद नुमा मालूम होता है। समझ लेना उसे महदूद कोताही है बीनश की। तेरा गेसू हमें लाइन्तहा मालूम होता है। इन शेरों से उनके दिल में गुरु के प्रति प्रेम और श्रद्धा के भाव, सब कुछ वह है (एको ब्रह्म, द्वितीयो नास्ति) के सूफियाना रंग और संगीतात्मकता की झलक का अन्दाजा लगाया जा सकता है। उन्होंने अपनी शायरी में अपने सेक्युलर विचारों को जगह-जगह पेश किया है। दूसरे धर्मों के बारे में उनके विचार ध्यान देने योग्य है। दर्शनसिंह जी दूसरे धर्मों के मार्गदर्शकों का वर्णन इस प्रकार करते हैं कि महसूस होता है कि वह उसी धर्म के मानने वाले हैं। वे सभी धर्मों के मानने वाले हैं। वे

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

यही समय की बर्बादी का भी कारण है। जीवन में प्रत्येक व्यक्ति को कभी न कभी अकेलेपन का सामना करना पड़ता है। यह दुःख इतना गहरा होता है कि मन की शांति खत्म हो जाती है और आत्म विश्वास घट जाता है। ये अकेलापन शारीरिक रोगो को न्योता देने लगता है। अकेलेपन के कारण व्यक्ति आत्म हत्या तक करने की सोचने लगता है। उस के नजदीक रहने वाले सगे संबन्धी भी चिंतित रहने लगते हैं। परिवार में नकारात्मक महौल पनपने लगता है। अकेलेपन के दुःख से बचने की सोचें और समय बर्बाद होने से बचाएं। जिन गानो, भजनों को सुन कर या फिल्म आदि देख कर आप का मन हल्का होता है, उन्हें जरूर सुने व देखें। निराशा वाले गाने व फिल्में नहीं देखनी। कोई नया साथी, नया मित्र, नया कार्य खोज लें। नया साथी आप खुद हैं और नया मित्र आप का भगवान है। नया कार्य विश्व की मन द्वारा सेवा है। भगवान को वक्त दें ।

इसके लिए पवित्र ग्रंथ पढ़ें। पसंद का म्यूजिक सुने, कार्टून शो देखें । अव्यक्त मुरली शिव बाबा

### अंतरीक बल

द्वारा उच्चारित महा वाक्य हैं। इन्हें पढ़ते ही हम ईथर के द्वारा भगवान से जुड़ जाते हैं। इसलिए जब भी अकेलापन लगे तुरंत अव्यक्त मुरली पढ़ो।

वह सब करें जो आप को अच्छा लगे परंतु कानून इजाजत देता हो, तथा किसी को मन से मदद करें, किसी को खुशी का संकल्प दें। भगवान को, ईष्ट को मन में देखें या उनके फोटो को देखें और बात करें। आप को अच्छा अच्छा लगेगा। आप को अकेलापन नहीं सताएगा। अकेलेपन को खत्म करने के लिए निम्न उपाय भी कर सकते है। सकारात्मक चिन्तन की पुस्तकें पढ़ें। महान लोगों की जीवनी पढ़ें। बच्चों के साथ खेलें। अपनी रूचि का कोई कार्य करते रहो। पौधे लगा सकते है। बगीचे में फूलो का रखरखाव करें फालतू समान से सजावटी चीजें बनाएं। अच्छे दोस्त बनाएं। लोगों से मिलें उनसे बातें करें। पिकनिक मनाये।

हर रिश्ता अनूठा है। हम जिंदगी का ९०% समय रिश्तो को निभाने में खर्च करते हैं। अगर रिश्ते अच्छे हों तो हम यह समय बचा सकते हैं। रिश्तो में प्यार भी है तो तकरार है। रिश्ते बनते भी रहते है तो टूटते भी रहते हैं। किसी को समझना होता है किसी को समझाना होता है। किसी को सहना पड़ता है और कहीं कोई हमें सहता है। रिश्ते हमें एक दूसरे पर आश्रित रखते हैं। रिश्ते लौकिक या अलौकिक यदि लड़खड़ाने लगते हैं तो हमारा मन प्रभावित होता है। मन प्रभावित होने से हमारी दिनचर्या प्रभावित होती है। जो इन्सान रिश्तो में भावुक हो जाता है वह परेशान हो जाता है। सम्बन्धों में प्यार रहे परंतु परेशानी भी न रहे। प्रायः सम्बन्धों में स्पर्श से ढांडस बंधाते हैं या आशीर्वाद देते हैं। परंतु हाथ के बजाय दृष्टि और हृदय से दूसरों को स्पर्श करें, आशीर्वाद दें। आप उन लोगों से दूर न रहें जिन्हें आप की प्रवाह है। सभी संबन्धी और रिश्तेदारों को समय दें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

एकदा गर्भसंस्कार वर्गामध्ये शमिका मला म्हणाली, डॉक्टर, तुम्ही एवढे सर्व आम्हांला गयला सांगता; परंतु हे सर्व संस्कार बाळावर करण्यासाठी आम्हाला वेळ तर मिळायला पाहिजे दिवसभरातील कामाच्या व्यापांतून मी कसा बरं वेळ काढावा? शमिकाचा प्रश्न ऐकल्यावर मी तिला सांगितले, अगं शमिका, वेळ मिळत नसतो, आपल्याला तो सुनियोजनपूर्वक काढावा लागतो. गर्भावस्थेत नियोजनपूर्वक जर तू दिनक्रम आखला, तर नक्कीच तुला संस्कार करण्यासाठी वेळ मिळेल. यावर शमिका म्हणाली,

डॉक्टर, आम्हाला दिनक्रम कसा असावा याबद्दल मार्गदर्शन करा. त्यानंतर मी त्यांना नियोजित दिनक्रम कसा असावा याबद्दल सांगण्यास सुरुवात केली. सर्वांच्याच बाबतीत हा दिनक्रम तंतोतंत पाळता येईल असे नाही. एकत्र कुटुंबातील गर्भवती, विभक्त कुटुंब, नोकरी करणारी, व्यवसाय सांभाळणारी गर्भवती या सर्वांच्या वेळा कामानुसार वेगवेगळ्या असतात. सकाळी काही गर्भवतींना मुलांचा, घरातील इतर सदस्याचा डबा करावयाचा

### गर्भवतींसाठी सुनियोजित दिनक्रम

असतो: त्यामळे प्रत्येक गर्भवतीने वेळेमध्ये थोडाफार फेरफार करून दिनक्रम ठरवावा व त्यातून आपले व बाळाचे स्वास्थ्य उत्तम राहील याची काळजी घ्यावी. १. लवकर उठणे (५.३० - ६.०० वा.):

**'लवकर निजे, लवकर उठे,**
**त्यास ज्ञान, आरोग्यसंपदा लाभे'.**

आयुर्वेदामध्ये दिनचर्या सांगताना सकाळी लवकर उठण्याचे महत्त्व सांगितले आहे. रात्री लवकर झोपून लवकर उठावे. उठल्यानंतर झोप पूर्ण झाली आहे ना, याची खात्री करावी व त्यानंतर गर्भसंस्कार तेलाने पोटाला हलकासा मसाज करावा व बाळाला देखील बाळा, आता उठ, सकाळ झाली आहे अशी सूचना द्यावी व त्यानंतर बिछान्यावरच बसून दोन ते तीन वेळा दीर्घश्वसन करावे. सकाळच्या वेळेस भावी माता-पिता दोघेही घरात असतात; त्यामुळे बाळाशी ससंवाद साधण्यासाठी ही वेळ अतिशय उत्तम असते. दोघांही पती-पत्नीने सुरुवातीला दीर्घश्वसन करावे. त्यानंतर मन एकाग्र होण्यासाठी तीन वेळा ॐकार करावा. पतीने पत्नीच्या पोटावर उजवा हात ठेवून व गर्भवतीने देखील तिचा उजवा हात पोटावर ठेवून बाळाशी संवाद साधावा. याबद्दलचे सविस्तर मार्गदर्शन 'बाळाशी सुसंवाद' या प्रकरणात केलेले आहे. संवाद साधताना घाई होऊ नये; म्हणून सकाळी लवकर वेळेत उठण्याचा प्रयत्न करावा. परीक्षेला जाताना वर्षभर नियोजनपूर्वक अभ्यास केल्यास त्याचे चांगले मार्क्स मिळून निश्चितच फळ मिळते. त्याच पद्धतीने तुम्ही गर्भावस्थेत जर नियोजनपूर्वक दिनक्रम आखला, तर नक्कीच तुमचे बाळ तेजस्वी संस्कारमय व सुदृढ होईल यात शंकाच नाही. तसेच आपण जे काही वागतो, बोलतो याचे बाळ अनुकरणच करत असते; त्यामुळे तुम्ही सकाळी लवकर उठल्यावर बाळदेखील लवकर उठण्यास शिकेल.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



'यंग सायंटिस्ट' स्पर्धेत चमकलेले आयकॉन पब्लिक स्कूलचे विद्यार्थी.

# 'यंग सायंटिस्ट' स्पर्धेत नगर येथील आयकॉन स्कूलचे विद्यार्थी चमकले

नगर – द आयकॉन पब्लिक स्कूलमधील तीन विद्यार्थ्यांनी ओएसिस स्कूल येथे आयोजित केलेल्या यंग सायंटिस्ट स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवून एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. नववीच्या वर्गातील विद्यार्थी वीर बोरा, अभिराज वाघस्कर आणि आदित्य कोतकर यांनी स्मार्ट इरिगेशन सिस्टीम या कृषी पद्धतींमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी तयार केलेल्या त्यांच्या महत्त्वपूर्ण प्रकल्पाने परीक्षकांना प्रभावित केले.

स्मार्ट सिंचन प्रणाली जमिनीतील आर्द्रता, हवामान परिस्थिती आणि पिकांच्या गरजा यांचे परीक्षण करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर होतो. पाण्याचा वापर सुनिश्चित करता येतो. हा नवोपक्रम केवळ पाण्याचेच संरक्षण करत नाही तर आधुनिक शेतीच्या आव्हानांसाठी शाश्वत दृष्टिकोन देत पीक उत्पादकता वाढवतो.

या तिघांच्या यशाला त्यांचे मार्गदर्शक, प्रफुल्ल सर यांनी मार्गदर्शन केले, त्यांच्या कौशल्याने आणि प्रोत्साहनामुळे संघाला त्यांची दृष्टी प्रत्यक्षात आणण्यात मदत झाली. विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संचालक कर्नल आर.सी. राणा आणि श्रीमती आराधना राणा, मुख्याध्यापिका श्रीमती दीपिका नगरवाला यांच्यासह शाळा व्यवस्थापनाने त्यांचे अभिनंदन केले.

शाळेच्या संचालकांनी सांगितले की, ही यश नवकल्पना, टीमवर्क आणि शाश्वत भविष्य निर्माण करण्यासाठी आमच्या तरुण मनाचे समर्पण दर्शवते.

आयकॉन पब्लिक स्कूल वास्तविक-जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि नवोपक्रमाला चालना देण्यासाठी विद्यार्थ्यांची वचनबद्धता दर्शवते.

# नर्मदा परिक्रमा हिंदूंची पवित्र यात्रा

## भक्तीताई साळवी यांचे प्रतिपादन; दुचाकीवर केला ३ हजार किलोमीटरचा प्रवास, महिला यात्रेकरुंचा विहिंप तर्फे सत्कार

नगर – नर्मदा परिक्रमा हिंदूंची पवित्र यात्रा आहे. नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे. जीवन जगत असताना प्रत्येकाने एकदा तरी नर्मदेची परिक्रमा करावी. तसेच देव, देश, धर्मासाठी संतांनी दाखविलेल्या मार्गाचे अनुकरण करावे. या यात्रेसाठी पिंपरी चिंचवडचे जिल्हा सह मंत्री गोविंद देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. नर्मदा परिक्रमाच्या यात्रेत जो आनंद मिळतो. तो अमर्याद आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेच्या पिंपरी चिंचवड येथील मातृशक्ती भक्तीताई साळवी यांनी केले आहे.




नर्मदा परिक्रमाचा ३ हजार किलोमीटरचा दुचाकीवर प्रवास करणाऱ्या महिला यात्रेकरूंचा विश्व हिंदू परिषदेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

पिंपरी चिंचवड येथील विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षा भक्तीताई साळवी व थेरगावच्या मातृशक्ती संयोजिका आशाताई घोलप यांनी दुचाकीवर जाऊन अवघ्या बारा दिवसात तीन हजार किलोमीटरचा प्रवास करून नर्मदा परिक्रमा पूर्ण करुन अहिल्यानगर येथे आले असता नालेगाव येथील जनकल्याण रक्तकेंद्रात विश्व हिंदू परिषद व जनकल्याण परिवाराच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ तसेच जनकल्याण रक्त केंद्राची संवेदना ही पुस्तिका भेट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे विशेष संपर्क विभागाचे प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर, मुकुल गंधे,जनकल्याण रक्तकेंद्राचे प्रशासकीय अधिकारी सागर उंडे, जनसंपर्क अधिकारी शरद बळे, डॉ.गौरी जोशी, स्मिता बडवे, सोनाली खांडरे, अमित टकले, विनिता धामणगावकर, मनीषा जोशी, चंद्रकला फंड, बाळासाहेब खरपुडे आदी उपस्थित होते.

आशाताई घोलप परिक्रमेचा अनुभव सांगताना म्हणाल्या, नर्मदा गंगा ही माता आहे. लेक आईच्या कुशीत हळुवारपणे जाते. नर्मदा माता आपल्याला सांभाळते, रस्ता खडतर असून देखील, प्रवासात भूक लागली, तहान लागली तरी ती भागवते. ज्या पद्धतीने संसाराचा मोह सोडून आपण वारीला जातो. त्याच पद्धतीने नर्मदा परिक्रमा ही एक वारीच आहे. वाटेत भेटलेल्या थोरमंडळी व संत मंडळी यांच्या मार्गदर्शनाने आपण मातेच्या जवळ जातो. असा सुखद अनुभव नर्मदा परिक्रमाचा यात्रेत येतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकुल गंधे यांनी केले. तर आभार सागर उंडे यांनी मानले.

# शिवप्रताप दिन इतिहासाला कलाटणी देणारा ठरला आहे

## देविदास मुदगल यांचे प्रतिपादन; श्री शिवप्रतिष्ठाण हिंदुस्थान आयोजीत शिबीरास प्रतिसाद, २५१ युवकांनी केले रक्तदान

नगर – हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतापगड च्या पायथ्याशी अफजलखानाचा वध केला तो दिवस शिवप्रताप दिन म्हणून अखंड महाराष्ट्रात साजरा केला जातो. हा दिवस इतिहासाला कलाटणी देणारा ठरला आहे. संभाजी भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवप्रताप दिन उत्साहाने साजरा केला जातो. गेल्या चार वर्षापासून केल्या जाणाऱ्या रक्तदान शिबिरात हजारो रक्तदात्यांनी सहभाग घेतला आहे. आज झालेल्या रक्तदान शिबिरात २५१ युवकांनी रक्तदान करून धर्मासाठी योगदान दिले आहे. या रक्तदान शिबिरासाठी जनकल्याण रक्तपेढीने अनमोल सहकार्य केले आहे. ज्या ज्या वेळेस रक्ताचा तुटवडा असेल त्यावेळी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे धारकरी रक्तदान करतील, असा विश्वास श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शहर प्रमुख देविदास मुदगल यांनी व्यक्त केला आहे.



श्री शिवप्रतिष्ठाण हिंदुस्थान आयोजीत शिबीरात २५१ युवकांनी रक्तदान केले.

नालेगाव येथे शिवप्रताप दिनानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात २५१ युवकांनी रक्तदान केले.

या रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची सिंहासनावर आरूढ असलेली मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे शहर प्रमुख देविदास मुदगल, शिवाजी वराडे, दिनेश जोशी, तानाजी देवकर, भूषण झारखंडे, सागर ठोंबरे, रवी चवंडके, महेश निकम, रवी म्हस्के, संदीप मोकाटे, राहुल म्हसे, सागर भालेकर, मनीष आजबे, संजय जाधव आदींसह जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ. विलास मढीकर, डॉ.गुलशन गुप्ता, डॉ.वसंतराव झेंडे, डॉ. मुनोत, गजेंद्र सोनवणे, सागर उंडे, स्मिता बडवे, सोनाली खांडरे, शरद बळे व कर्मचारी यांनी रक्त संकलनाचे कार्य केले.

# नगर शहरामध्ये ११ ते २४ डिसेंबर दरम्यान मोफत होमिओपॅथी त्वचारोग तपासणी शिबिर

नगर – कोणतेही दुष्परिणाम विरहित परिणामकारक उपचार पद्धती म्हणून होमिओपॅथी उपचार पद्धतीची ओळख आहे. आजारांचे मूळ कारण शोधून ते नाहिसे करण्यावर होमिओपॅथीचा भर असतो. या उपचार पध्दतीचा जास्तीत जास्त रूग्णांना लाभ होण्यासाठी होमिओपॅथी व पुष्प औषधी तज्ज्ञ डॉ. रोहित गुगळे व डॉ. सपना गुगळे यांनी आपल्या नगरमधील महाजन गल्ली व बुरूडगाव रोडवरील वैभव हॉटेल समोरील क्लिनिक येथे मोफत होमिओपॅथी त्वचारोग तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिराचे आयोजन केले आहे. ११ ते २४ डिसेंबर या कालावधीत सकाळी १० ते २ आणि सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सदर शिबिर होणार आहे.



शिबिरात सौंदर्य समस्यांवर मोफत तपासणी आणि सवलतीच्या दरात औषधोपचार केले जातील. यात शिबिरात सहभागी होणाऱ्यांना मोफत फेस वॉश दिले जाणार आहे. पिंपल्स व त्याचे डाग, वांग व काळे डाग, मस व चामखीळ, डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे, अनावश्यक केसांची वाढ (लव), चेहऱ्यावरील सुरकुत्या यावर प्रभावी उपचार केले जाणार आहेत.

प्रत्येक जण स्वतःच्या चेहऱ्याचे आरोग्य व दिसणे याबाबत सजग असतो. त्यामुळे त्यांना होमिओपॅथी उपचार पद्धतीने चेहऱ्याचे चांगले आरोग्य देण्याचा प्रयत्न शिबिरात केला जाईल. या मोफत तपासणी शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. गुगळे यांनी केले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क: ९८२३५६३६४३.



येळकोट येळकोट जय मल्हार या जयघोषात भुतकरवाडी भिंगारदिवे मळा येथून चंपाषष्ठी उत्सवनिमित्त भिंगार दिवे मळ्यातील जय मल्हार योगी मठ भक्त मंडळाच्या वतीने खंडोबाची भिंगारदिवे मळा ते सावेडी गावांतील जय मल्हार युवा प्रतिष्ठानचे पावन खंडोबा मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली होती. (छाया – उदय जोशी)

# चंपाषष्ठी उत्सवनिमित्त पालखी मिरवणूक व महाप्रसाद

नगर – चंपाषष्ठी उत्सवनिमित्त भूतकरवाडीतील भिंगार दिवे मळ्यातील जय मल्हार योगी मठ भक्त मंडळाच्या वतीने खंडोबाची मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी श्री सदगुरू योगी योगेश्वर नाथ महाराज या मिरवणुकीत सामील झाले होते. येळकोट येळकोट जय मल्हार या जयघोषात भिंगारदिवे मळा ते सावेडी गावांतील जय मल्हार युवा प्रतिष्ठानचे पावन खंडोबा मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. फुलाचा वर्षाव, रांगोळ्या, औक्षण करण्यात आले.

# सनातन धर्म कार्याची परंपरा पवित्र असून ग्रंथसंपदाचा ठेवा अनमोल

## हभप अमळनेरकर महाराज

नगर – अहिल्यानगर मधील सनातन धर्मसभेला ११८ वर्षाची प्राचीन परंपरा असून सम ाजातील प्रत्येक व्यक्तीने येथील कार्यास हातभार लावला असंख्य दानवीरांनी अनमोल असे योगदान दिले. त्यामुळे सनातन धर्म संस्थेची प्रगती होत आहे. सनातन धर्म कार्याची परंपरा पवित्र असून येथे उपलब्ध असलेले प्राचीन ग्रंथसंपदाचा ठेवा अनमोल आहे. त्याचे पठण समाजातील सर्वांनी करावे, असे प्रतिपादन हभप प्रसाद महाराज अमळनेरकर यांनी केले.



महाजन गल्लीमधील सनातन धर्मसभेच्या नूतन ग्रंथालयाच्या इमारतीचे उद्घाटन हभप प्रसाद अमळनेरकर महाराज यांच्या हस्ते झाले याप्रसंगी अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक, उपाध्यक्ष घनपाठी महेशजी रेखे, कार्यकारिणीचे सदस्य आदी (छाया– विजय मते)

महाजन गल्लीतील सनातन धर्मसभेच्या ग्रंथालयाच्या नूतन वास्तूचा शुभारंभ हभप अमळनेरकर महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक, उपाध्यक्ष घनपाठी महेश रेखे, विश्वस्त दिनकर देशमुख, रमेश देशपांडे, अ‍ॅड्व्होकेट उमेश नगरकर, सागर उपाध्ये, निलेश धर्माधिकारी, मोरेश्वर मुळे, राजेंद्र नगरकर, डॉ.नंदकिशोर मुळे, उमेश वाळुंजकर, श्रीपाद तांबोळी, अनंत देशपांडे, उदय वैकर, कार्यकारणी सदस्य, भाविक उपस्थित होते.

### नगरमधे ग्रंथालयाचा शुभारंभ

हभप अमळनेरकर महाराज पुढे म्हणाले सनातन धर्मसभेच्या ग्रंथालयात १५ हजारांपेक्षा जास्त दुर्मिळ पुस्तकांचा संच उपलब्ध आहे. यामध्ये हस्तरेखित शीला प्रेस छापील पोथ्या, कथाग्रंथ, मासिके मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी गेली ५० वर्षापासून संस्थेचे हितासाठी प्रगतीसाठी अथक प्रयत्न केले. गायत्री मंदिर, ज्ञानेश्वर हॉल झाला आणि आता शारदा मंदिर हे भव्य सनातन धर्म सभेचे ग्रंथालय उभे राहिले. आजच्या तरुण पिढीने जास्त मोबाईल च्या आहारी न जाता प्राचीन ग्रंथांचे वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालावी. असे आवाहन अमळनेरकर महाराज यांनी केले आहे.

प्रास्ताविकात वेदमूर्ती दत्तोपंत पाठक म्हणाले ब्रह्म वृंदांच्या पठणासाठी अतिशय उपयुक्त असे ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहे त्याचा अभ्यास वाचन करून ते मुखद्वत होतात आणि त्याद्वारे केलेले आव्हान त्यापासून निघालेल्या ध्वनीचे पवित्र हे वेगळेच असते. मोबाईलद्वारे केलेले पाठपूजा याची प्रचिती मिळत नाही. अहिल्यानगर येथील वेदमूर्ती जे तयार झाले आहेत त्यांचे वाचनाने उच्चार, स्पष्ट आणि व्यवस्थित होतात घनपाठी वेदमूर्ती महेश रेखे यांनी अनेक ग्रंथांचे वाचन करून मंत्रोच्चार मुखद्वत केले आहे. पठणाने ज्ञानात मोठा बदल होतो. तेव्हा या ग्रंथालयाचा उपयोग सर्वांनी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी सरस्वती पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी ब्रह्मा वृंदांच्या वेद पठाणाने कार्यक्रमाचे वातावरण मंगलमय झाले होते.

# 'पेशवाई क्रिएशन'चा वर्धापन दिन थाटात साजरा

नगर – 'अनुभूती नाविन्याची, परंपरा शाही वस्त्रांची' या ओळी अगदी तंतोतंत लागू होणारे पुण्यातील वस्त्र खरेदीचे ठिकाण म्हणजे पेशवाई क्रिएशन. ज्याच्या नावातच घरंदाजपणा आणि वस्त्रांचा साज आहे असे हे पेशवाई दालन. पुण्यनगरीला अत्यंत साजेसे असे नाव पेशवाई क्रिएशन. लग्न समारंभ असो किंवा कोणतेही सण असोत, ग्राहकांची पाऊले आपसूकच पेशवाईकडे वळतात. नुकताच पेशवाईने आपला ३१ वा वर्धापन दिवस आपल्या ग्राहकांसोबत मोठ्या उत्साहाने साजरा केला. ३१ वर्षांपूर्वी, दत्तात्रय पेदण्णा येमूल यांनी एक भव्य–दिव्य स्वप्न पहिले. त्यांच्याकडे कापड उद्योग क्षेत्रातला अतिशय प्रदीर्घ अनुभव गाठीशी होता. या अनुभवाचा फायदा ग्राहकांना वाजवी दरात अत्त्युत्तम दर्जाची आणि वैविध्यपूर्ण वस्त्र श्रेणी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी १९९३ साली पेशवाईची मुहूर्तमेढ रोवली. अतिशय विनम्र सेवा, वाजवी दर आणि निवडीला भरपूर वाव या वैशिष्ट्यांमुळे पेशवाई अल्पावधीतच ग्राहकांच्या पसंतीस उतरले.




पुण्यातील लक्ष्मी रोड येथे १९९३ साली स्थित झालेले पेशवाई हे वस्त्र दालन सर्वांच्याच परिचयाचे आहे. ३१ व्या वर्धापनदिनी ग्राहकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. तसेच यंदाच्या वर्षी, लग्नाचे मुहूर्त बरेच असल्याने आता देखील ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. पेशवाई म्हणजे अत्यंत नाविन्यपूर्ण साड्या, मनमोहन डिजाईन आणि भरपूर व्हरायटी इत्यादीची खात्री. नेहमीच वेगवेगळी डिजाईन्समध्ये उपलब्ध असलेल्या इथल्या साड्यांची रंगसंगती, कलाकुसर ही मन मोहून टाकणारी असते. साड्यांची भरपूर व्हरायटी इथे उपलब्ध आहे. पेशवाई पैठणी ही इथली खासियत म्हणता येईल. त्याच सोबत पैठणी, गढवाल, कांजीवरम, बनारसी, नारायनपेठी या पारंपरिक प्रकारांसोबत अनेक आधुनिक डिझायनर, वर्कच्या साड्या व लेहंगा व घागरा देखील पेशवाईमध्ये उपलब्ध आहेत आणि म्हणूनच कोणताही सण उत्सव असो, साड्यांची खरेदी ही फक्त पेशवाईमध्ये केली जाते. लग्नासाठीचा खास बस्ता तसेच नववधूसाठी खास साड्या पेशवाईमध्ये आहेत. पेशवाईचा ३१ वर्षांचा अभूतपूर्व प्रवास – १९९३ ते २००० सालापर्यंतच्या पेशवाईच्या प्रवासात उत्तम सेवा आणि अत्त्युत्तम दर्जा यामुळे ग्राहकांचा खूपच चांगला प्रतिसाद मिळत गेला. या कालावधीमध्ये पेशवाई आणि ग्राहकांमध्ये एक अनोखा स्नेहबंध तयार झाला ग्राहक म्हणजे जणू पेशवाईची चालती बोलती जाहिरातच ठरू लागले. या प्रचंड प्रतिसादामुळे ग्राहकांना अधिकाधिक चांगली सेवा देण्यासाठी २००० साली कुमठेकर रस्त्यावर ५००० स्वेअर फूट चे भव्य वस्त्रदालन सुरु केले आणि मग पेशवाईची वाटचाल प्रगती पथावर सुरू झाली.

२००० साली नव्या वास्तुत स्थलांतरित झालेल्या 'पेशवाई क्रिएशन' च्या वस्त्रदालनास सर्व प्रकारच्या ग्राहकांचा उदंड प्रतिसाद मिळू लागला. विशेषतः लग्न बस्त्याच्या खरेदीसाठी पुणे आणि पुण्याबाहेरील ग्राहकांची पेशवाईला पहिली पसंती मिळत होती. खरेदीला येणाऱ्या पुरुष ग्राहकांची गैरसोय होऊ लागल्यामुळे 'पेशवाई क्रिएशन्स' समोरच 'पेशवाईज् श्रीमंत कलेक्शन' हे पुरुषांसाठीच्या वस्त्रखरेदीसाठीचे भव्य दालन सुरु केले. 'पेशवाईज् श्रीमंत कलेक्शन'मध्ये पारंपारिक आणि इंडो वेस्टर्न पोषाखाबरोबरच धोती–कुर्ता, उपरणे, जोधपुरी, जॅकेट्स तसेच शर्ट्स, टी– शर्ट्स, ट्राउजर, जीन्स व ब्रँडेड रेडीमेड्स अशा वस्त्रप्रावरणांची विपुल श्रेणी उपलब्ध करून दिल्यामुळे अल्पावधीतच 'पेशवाईज् श्रीमंत कलेक्शन' ग्राहकांचे आवडते वस्त्र दालन झाले. इथे खास पुरुषांसाठी भरपूर वस्त्रांची व्हरायटी उपलब्ध केली आहे. आकर्षक कुर्ते, सलवार कमीज याच सोबत धोती, जोधपुरी, असे अनेक प्रकार इथे उपलब्ध आहेत. डेली वेअरसाठी भरपूर कलेक्शन श्रीमंतमध्ये बघायला मिळते. याच सोबत मोजडी पासून ते फेट्यांपर्यंत इथे सर्वच मिळते. सन २०१९ मध्ये पेशवाईने नगर येथे नवीन शाखा उघडली. दिवसागणिक पेशवाई मध्ये खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांचा ओघ वाढतच आहे. ग्राहकांची विश्वासार्हता हीच पेशवाईची मोठी संपत्ती आहे. आज बाहेरगावाहून पेशवाईमध्ये खरेदीला येणाऱ्यांची संख्या देखील मोठी आहे. पेशवाईमध्ये मिळणारी सर्व्हिस देखील अत्यंत चांगली आहे. पेशवाईमध्ये खरेदी म्हणजे खरेदीचा मनसोक्त आनंद आणि खरेदीचे आत्मिक समाधान. सण उत्सव वा असो मंगलकार्य, वस्त्र खरेदीसाठी फक्त पेशवाईच...



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी उपस्थित कार्यकारिणी मंडळ. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

# सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – ज्येष्ठ नागरिक मंच सावेडी या संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आदिनाथ जोशी यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात झाली. सर्वप्रथम दिवंगतांना व सभासद यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संस्थेचे माजी अध्यक्ष व सल्लागार सर्वोत्तम क्षीरसागर यांची जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मंचातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

मागील वर्ष २०२३–२४ च्या कामकाजाचा अहवाल तसेच मागील वर्षाचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कार्यवाहक शरद कुलकर्णी यांनी सादर केले. आर्थिक पत्रके मोरेश्वर मुळे तर पुढील वर्षाचे अंदाजपत्रक आदिनाथ जोशी यांनी सादर केले. अहवाल, इतिवृत्त व अंदाजपत्रक मागील वर्षाचे आर्थिक पत्रके, इत्यादींना यावेळी एकमताने सभेने मंजुरी दिली.

कार्यवाह शरद कुलकर्णी यांच्या आर्किटेक कन्येची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी आर्किटेक्चरल कन्सल्टन्सीसाठी निवड व श्रीमती कुमुदिनी बोपर्डीकर यांच्या 'स्वरानंद' संस्थेस जिल्हास्तरीय भजन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल मंचातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. सभासदांचे प्रश्नांचे व शंकांचे समाधान आदिनाथ जोशी व मोरेश्वर मुळे यांनी केले व त्यांच्या सूचनांची दखल घेण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आर्थिक पत्रके वाचन मोरेश्वर मुळे यांनी केले तर स्नेहल वेलनकर यांनी आभार मानले. समारोपाप्रसंगी अल्पोपहार व चहापान देऊन सभा झाली



झेन्सर टेक्नॉलॉजी लिमिटेडमध्ये नोकरीसाठी फरहान शेखची निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करताना अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जे.बार्नबस. समवेत डॉ. सय्यद रज्ज़ाक, शितल अत्रे, माधुरी देठे, रूपाली कुलकर्णी आदी.

# ‘झेन्सर टेक्नॉलॉजी लिमिटेड’मध्ये नोकरीसाठी फरहान शेखची निवड

## अहमदनगर महाविद्यालयाच्या वतीने सत्कार

नगर – अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन त्यांना चांगले नोकरीच्या संधी उपलब्ध व्हावे यासाठी अनेक कॅम्पस मुलाखती आयोजन करण्यात येते. यामध्ये विद्यार्थी सहभागी होतात बघतेस महाविद्यालयाच्या वतीने कॅम्पस मुलाखतीमध्ये झेन्सर टेक्नॉलॉजी लिमिटेड या कंपनीने फरहान शेख या विद्यार्थ्याचे निवड करून त्याला या संस्थेमध्ये स्थान देण्यात आले.

फरहान शेख जो सध्या MSc (CA) द्वितीय वर्षात आहे आणि अहमदनगर महाविद्यालयातून BCS पूर्ण केले आहे, त्याला झेन्सर टेक्नॉलॉजी लिमिटेडमध्ये स्थान देण्यात आले आहे. झेन्सर ही संस्था आरोग्यसेवा, शिक्षण इत्यादींसह अभियांत्रिकी सेवा, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, सुरक्षा सेवा इत्यादींमध्ये काम करत आहे. फरहान त्याच्या पहिल्या वर्षात सर्वोच्च रँकर आहे आणि त्याला ६.५ LPA पॅकेजच्या पहिल्या कमाईसह AI क्षेत्रात पोस्टिंग मिळाली आहे.

या यशाबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.जे.बार्नबस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नॉन ग्रॅण्टचे समन्वयक डॉ. सय्यद रज्ज़ाक, शितल अत्रे, माधुरी देठे, रूपाली कुलकर्णी आणि शिक्षक वर्ग आदी उपस्थित होते.

# मुलांना खेळात करिअर करायचे असेल तर पालकांशी सुसंवाद साधणे गरजेचे

## संजय धोपावकर यांचे प्रतिपादन; केडगावच्या सरस्वती प्राथमिक विद्यालयात रंगला बालक्रीडा मेळावा, विविध मैदानी स्पर्धेत खेळाडूंनी दाखवले कौशल्य

नगर – मुलांना खेळात करिअर करायचे असेल तर पालकांशी सुसंवाद साधणे गरजेचे आहे. एकतरी आवडीचा मैदानी खेळ खेळण्याचे पेमराज सारडा कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख संजय धोपावकर यांनी सांगितले.

केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा बालक्रीडा मेळावा शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. झालेल्या विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवली.



केडगावच्या सरस्वती प्राथमिक विद्यालयात रंगला बालक्रीडा मेळाव्याचे उद्घाटनप्रसंगी उपस्थित.

बालक्रीडा मेळाच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संजय धोपावकर, न्यू लॉ कॉलेजचे शारीरिक शिक्षण विभागाचे सुनील जाधव, आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू सीमा लाड, संस्थेचे सह कोषाध्यक्ष आर.आर. पवार, बी.एड कॉलेजचे प्राचार्य अमरनाथ कुमावत सर,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, ए.वाय. कुलकर्णी, प्रज्ञा आसनिकर, संभाजी पवार, जालिंदर कोतकर, मनोज कोतकर, काजळे सर, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी आदींसह शिक्षक वृंद विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. सुनिल जाधव यांनी मुलांना अभ्यासासोबत खेळाचे महत्त्व विशद केले. तर कोणताही खेळ हा स्पर्धेपुरता न खेळता पुढे त्याचा सराव सातत्याने चालू ठेवण्याचे आवाहन केले. अविनाश साठे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करुन जीवनात खेळाचे महत्त्व विशद केले.

आर.आर. पवार म्हणाले की, खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो. खेळामध्ये जय–पराजय महत्त्वाचा नसून स्पर्धेत उतरणे व आपल्यातील कौशल्य दाखवणे महत्त्वाचे असते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी उद्घाटनाप्रसंगी संचलन व अम्ब्रेला ड्रिल सादरीकरण केले. यावेळी कबड्डी, डॉजबॉल, स्लो सायकलिंगचे सामने मैदानावर चुरशीने रंगले होते. सूत्रसंचालन करुन स्मिता खिलारी यांनी आभार मानले.

# ‘क्वांटम ऍक्सिलरेटेड टेक्नोलॉजी’ वर शिक्षक विकास कार्यशाळा

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालयात क्वांटम ऍक्सिलरेटेड टेक्नोलॉजि या विषयावर एक दिवसीय शिक्षक विकास कार्यशाळा झाली. या एकदिवसीय कार्यशाळेसाठी सी–डेक पुणे येथील संगणक तज्ञ निखिलेश गायकवाड, कनिष्का, आशय अभिषेक विशू हे तज्ञ म्हणून लाभले. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे डेप्युटी डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. उदय नाईक माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. दिपक विधाते, कॉम्पुटर सायन्स आणि डिसाइन विभाग प्रमुख डॉ. आर. एस. तांबे तसेच सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विध्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळेच्या सुरुवातीला प्रा.सौ.पूजा वैकर यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट व स्वरूप विषद केले.



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षक विकास कार्यशाळा झाली. संगणक तज्ञ निखिलेश गायकवाड यांचा सन्मान करताना प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.उदय नाईक, तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. दिपक विधाते, प्रा. पुजा वैकर आदी (छाया – विजय मते)

क्वांटम कॉम्पुटिंग हे एक अत्याधुनिक संगणक असून हे कॉम्पुटर सायन्स फिसिकस, मॅथेमॅटिकस या शाखेतील विविध पैलूंचा समावेश असलेले बहू विषय क्षेत्र आहे जे पारंपारिक संगणकाच्या तुलनेत क्लिष्ट समस्या जलद गतीने सोडवण्यासाठी क्यॉट्म मेक्यानिकस चा वापर करते. या क्षेत्रामध्ये हार्डवेअर संशोधन आणि अनुप्रयोग विकास समाविष्ट आहे. क्वांटम संगणक हेच भविष्यातील तंत्रज्ञान असणार असून अतिशय वेगवान काम करून भविष्यात नवीन चित्र उभे करणार आहे. तरी या अत्याधुनिक विषयाचा लाभ शिक्षक तसेच विध्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या माध्यमातून घ्यावा. असे आवाहन संस्थेचे डेप्युटी डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे यांनी केले.

या वेळी सी–डेक पुणे येथील तज्ज्ञांनी क्वांटम कॉम्पुटिंग वरील सर्व मूलभूत संज्ञा अत्यंत प्रभावी पणे समजावून सांगितल्या त्याच प्रमाणे क्योंट्स कॉम्पुटिंग च्या साधनांचा वापर करण्याच्या अनुभवाचा अंतर्भाव असलेले प्रात्यक्षिके सादर करून ते शिक्षक तसेच विद्यार्थ्यांकडून करून घेतले.

या कार्यशाळेचे आयोजन माहिती तंत्रज्ञान विभाग व कॉम्पुटर सायन्स आणि डिसाइन या विभागामार्फत करण्यात आले. कार्यशाळेच्या यशश्वीतेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.दिपक विधाते, कार्यशाळा शिक्षक समन्वयक प्रा.सौ.पूजा वैकर, प्रा. सौ.पी. एस. डोलारे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विध्यार्थी यांनी केले.

या कार्यशाळेसाठी संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

# वाघोली मध्ये १५ डिसेंबर रोजी मराठा वधू–वर पालक मेळावा

नगर – सगेसोयरे वधु–वर सेवा केंद्र पुणे यांच्या वतीने १५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते २ या वेळेत सारथी वेलनेस सेंटर, कोठारी बिल्डींग, नगर रोड, वाघोली, पुणे येथे सकल मराठा वधू–वर व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यास वधू वर व त्यांच्या पालकांनी उपस्थित राहावे असे आवाहन केंद्राचे कार्याध्यक्ष उद्योजक हरीभाऊ जगताप पाटील व संघटक लक्ष्मणराव मडके यांनी केले आहे. हल्ली मराठाच नव्हे सर्वच समाजात मुला–मुलींचे लग्न जमविणे हे जिकिरीचे होऊन बसले आहे.

पूर्वी नात्यातून स्थळे येत होती, ती पद्धत आता बऱ्याच अंशी बंद झाली आहे. पै–पाहुण्यांना वेळ मिळत नाही आणि खासगी वधूवर केंद्राकडून पालकांची लूट केली जात आहे. या पार्श्वभूमीवर अशा समाजाकडूनच आयोजित केलेल्या वधूवर मेळाव्यांची चांगली मदत होत आहे.

प्रत्येकवेळी या वधूचर मेळाव्यास उपस्थित राहून लग्न जमण्याचे प्रमाणही वाढत आहे. नाममात्र शुल्कात घेट मुला–मुलींना पाहण्याची संधीच या मेळाव्यात उपलब्ध होते. त्यात पसंती झाल्यास पुढे जाऊन प्रत्येकाने सोयरिक करण्यासाठी प्रयत्न केले जातात. परंतु प्राथमिक माहितीसाठी या मेळाव्याचा चांगला उपयोग होत असल्याच्या समाजातील पालकांच्या प्रतिक्रिया आहेत.

मेळाव्यात उच्चशिक्षित, शिक्षित, व्यावसायिक, उद्योजक, कारखानदार, शेतकरी बद् वरांसह विधवा, विधूर, घटस्फोटीत यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर राहणार असून मेळाव्यातील सर्व सहभाग घेणाऱ्या सदस्यांची यावेळी मारधी वेलनेस सेंटर माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी ९६८९०४७२७० हा या संपर्क साधावा, हा मेळावा यशस्वी करण्यासाठी विजया देशमुख, सुवर्णा माने, आयोध्या जगताप, सदाशिव राजेभोसले, चंद्रशेखर कदम, कृष्णा लोखंडे, बाळासाहेब आढाव, शशिकांत मोरे, कुमार सातव, अभिजित सातव आदीसह सकल मराठा समाजातील विविध संघटनेचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

# समाजाचा पाया भक्कम करण्यासाठी सुसंस्कारी पिढीची गरज

## माजी नगरसेविका दिपाली बारस्कर यांचे प्रतिपादन; स्नेहालयात रंगली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा, अवघ्या ५ मिनीटात गणिताचे पेपर सोडवून विद्यार्थ्यांनी केले अवाक

नगर – शिक्षणाबरोबरच मुलांमध्ये सामाजिक संवेदना जागरुक करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून स्नेहालयात घेण्यात आलेली स्पर्धा कौतुकास्पद आहे. शिक्षण व संस्कारातून सशक्त पिढी घडणार आहे. समाजाचा पाया भक्कम करण्यासाठी सुसंस्कारी पिढीची गरज असून, या उद्देशाने ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या जीवनात स्फुर्ती देणारी ठरणार असल्याचे माजी नगरसेविका दिपाली बारस्कर यांनी सांगितले.

एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस ॲण्ड वैदिक मॅथस असोसिएशनच्यावतीने घेण्यात आलेली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सकाळच्या सत्रात घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठमोठी गणिते झटपटपणे सोडवित अवघ्या ५ मिनीटाच्या आतमध्ये आपला पेपर सोडवित उपस्थितांना अवाक केले.

ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेवल १ ते ५ व वैदिक मॅथ्स या गटात घेण्यात आली. ५ मिनीटाच्या राऊंडमध्ये अवघड गणिती प्रक्रियेचे पेपर विद्यार्थ्यांनी अत्यंत जलदगतीने सोडविली. यामध्ये नगर, पुणे, शेवगाव, संभाजीनगर, दौंड, श्रीगोंदा, सोनई, कल्याण, नवी मुंबई, मिरजगांव येथून विद्यार्थी सहभागी झाले होते.



एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस ॲण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्यावतीने घेण्यात आलेली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली.

स्पर्धेनंतर झालेल्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका दिपाली बारस्कर, स्नेहालयाचे कार्याध्यक्ष अनिल गावडे, जिजाऊ ब्रिगेडच्या अनिता काळे, नवनागापूरचे सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, योगा ॲण्ड एरोबिकच्या डॉ. शिल्पा बालवे आदींसह विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत सुनिल काळाणे यांनी केले. प्रास्ताविकात हेमलता काळाणे म्हणाल्या की, कुशाग्र बुध्दीमत्तेसाठी दोन्ही मेंदू कार्यरत असणे आवश्यक असते. अबॅकसने बौद्धिक विकासाला चालना मिळून दोन्ही मेंदू कार्यरत होतात. यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांसाठी अबॅकस व वैदिक मॅथ्स उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पंचवीस वर्षापासूनचा सामाजिक कार्यात झोकून देऊन उपेक्षितांसाठी उभे राहिलेल्या स्नेहालयाच्या विविध प्रकल्पांची माहिती देणारा लघुपट विद्यार्थी व पालकांना दाखविण्यात आला.

अनिता काळे म्हणाल्या की, शिक्षण व संस्काराने घडलेली मुले जीवनात आपले ध्येय गाठतात. ज्ञानदान हे जगातील सर्व श्रेष्ठ दान असून, यामुळे संपूर्ण आयुष्याचे कल्याण होते. शिक्षक समाज घडवितात, त्याप्रमाणे मुलांच्या आईने देखील विद्यार्थ्यांवर जिजाऊं–प्रमाणे शिवबासारखे संस्कार घडविण्याचे त्यांनी आवाहन केले.

स्नेहालयाचे अनिल गावडे म्हणाले की, आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर गणित उपयोगी पडते. गणित हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असून, गणित सोपं करणारे साधन म्हणून अबॅकस विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त बनले आहे. ज्यांचे गणित चांगले झाले, त्यांच्या जीवनाचे गणित बिघडत नसल्याने सांगितले. तर स्नेहालयाच्या कार्याची त्यांनी माहिती दिली.

राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत विविध गटातून पतणे राजनंदिनी बसवेश्वर, बडे प्रथमेश शरद, जायभाय आर्या सुरेश, पवार साईकृष्ण राजेंद्र, लोहकरे उत्कर्ष सोमेश्वर, धापटकर आयुष राहुल यांनी चॅम्पियन्स ट्रॉफी पटकाविली. सर्व गटातील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीसह बक्षीस देण्यात आले. तर सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा देखील सन्मान करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षण सविता काकडे, अश्विनी सादुल, दीपाली अदलिंगे व सना सय्यद यांनी केले.

सूत्रसंचालन ऋग्वेदी कदम व उज्वला मुरकुटे यांनी केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अश्विनी मचे, स्वाती घुले, राधिका दहातोंडे, नम्रता गांगरडे, निकिता काकडे व युनिव्हर्सल अबॅकस असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# विविध सामाजिक उपक्रमाने ‘नालंदा’मध्ये बालदिन साजरा

नगर – बालदिन हा मुलांचा हक्काचा दिवस असतो या दिवश विद्यालयामध्ये खेळ, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे मजेदार उपक्रम आयोजित केले जातात. प्रत्येक मुलाच्या अंगात एक कला गुण असतो. बालदिन मुलांच्या वाढीसाठी आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित करतो. बालकांचे हक्क, शिक्षण आणि कल्याण याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी भारतात बालदिन साजरा केला जातो. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वत्र उत्साहात बालदिन साजरा केला जातो. याचे औचित्य साधून नगर सोलापूर रोडवरील नालंदा स्कूलमध्ये विविध सांस्कृतिक उपक्रमाने बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी रॉक बँड, टॅटू सेल्फी कॉर्नर, कायरोज ऑर्केस्ट्रात स्वतः गाणे गायले त्याच्यावर डान्स करत विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही



मनमुराद आनंद लुटत विविध सांस्कृतिक उपक्रमाने नगर सोलापूर रोड वरील नालंदा स्कूलमध्ये बालदिन उत्साहात झाला.

यावेळी बोलताना विद्यालयाच्या प्रिन्सिपल हैदर डिसूजा म्हणाल्या की मुलांवर प्रेम करणाऱ्या नेहरूंच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. ’चाचा नेहरू’ म्हणून त्यांची एक वेगळी ओळख होती त्यांना मुलांबद्दल खूप जिव्हाळा होता आणि त्यांच्यासोबत वेळ घालवण्याचाही त्यांना मोठा आनंद मिळत असे.१९६४ मध्ये त्यांचे निधन झाल्यानंतर त्यांचा वाढदिवस बालदिन म्हणून साजरा करून त्यांचे मुलांविषयी असलेले प्रेमाची आठवण या दिनानिमित्त होत असते.

यावेळी बालचमुंनी विद्यालयातील भिंतीवर दरवाजावर काढलेल्या कलाकृती आकर्षक होत्या.

# श्री संत नागेबाबा मल्टीस्टेटच्या कर्जदारास शिक्षा

नगर – श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटी शाखा मार्केट यार्डचे कर्जदार प्रशांत सुभाष जाधव (रा. अहील्यानगर) यांनी संस्थेच्या कर्जबाकी पोटी दिलेला धनादेश वटला नाही म्हणून कर्जदार जाधव यांना अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. निराळे यांनी चेक रक्कम ०१,१०,००० रुपये दंडासहित २,२०,००० रुपये आणि दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा तसेच सदर रक्कम संस्थेत न भरल्यास सहा महिन्याची कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

या खटल्यामध्ये श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटीच्या वतीने ॲड. राऊत यांनी कामकाज पाहिले.

# सावेडी जॉगिंग ट्रॅकच्या भिंतींवर स्वच्छतेचा संदेश






नगरमधील सावेडी जॉगिंग ट्रॅकच्या भिंतींवर रंगवलेला स्वच्छतेचा संदेश. (छाया– उदय जोशी)

## खा. निलेश लंके यांच्या पुढाकाराने रंगकाम पूर्ण

नगर – सावेडी येथील क्रिडामहर्षी मेजर दिनुभाऊ कुलकर्णी जॉगिंग ट्रॅकच्या भिंतींना स्वच्छता संदेश देणाऱ्या आकर्षक रंगकामाने सजविण्यात आले आहे. हे कार्य स्वच्छ भारत अभियानाच्या निधीतून खासदार निलेश लंके यांच्या शिफारसीवरून करण्यात आले आहे. या भिंतींवर स्वच्छतेबाबत जनजागृती करणारे संदेश व चित्रे रंगविण्यात आली असून, यामुळे परिसरातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचा उद्देश साधला जात आहे.

नगरसेवक योगिराज गाडे व स्थानिक नागरिकांनी या जॉगिंग ट्रॅकच्या भिंतींवरील रंगकामाबाबत खासदार निलेश लंके यांना निवेदन दिले होते. या विनंतीला प्रतिसाद देत खासदार लंके यांनी तात्काळ पुढाकार घेतला आणि स्वच्छ भारत अभियानाच्या निधीचा योग्य वापर करून हा प्रकल्प पूर्णत्वास नेला.

या रंगकामात स्वच्छता, पर्यावरणसंवर्धन, प्लास्टिक मुक्ती, यदि कुछ लेना चाहते है तो देना सिखो, चंद्र, सूर्य, तारे आले जरी हाती तरी पायाखालची सुटू नये माती, झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरणाचे रक्षण करा यांसारख्या विषयांवर संदेश रंगविण्यात आले आहेत. आकर्षक रंगसंगतीमुळे या भिंती परिसरात येणाऱ्या नागरिकांचे विशेष आकर्षण ठरत आहेत. जॉगिंग ट्रॅकवर व्यायामासाठी येणाऱ्या लोकांमध्ये यामुळे सकारात्मकता निर्माण होत आहे.

योगिराज गाडे म्हणाले, या प्रकल्पामुळे स्वच्छतेविषयी जागरूकता वाढेल. खासदार निलेश लंके यांनी या प्रकल्पासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे हे शक्य झाले आहे. सर्व नगर स्वच्छ व निरोगी राहण्यास याने नक्कीच मदत होईल. स्थानिक नागरिकांनीही स्वच्छतेच्या संदेशाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

खासदार निलेश लंके यांनी यावेळी सांगितले की, स्वच्छ भारत अभियान हा केवळ सरकारी उपक्रम नसून, तो प्रत्येक नागरिकाचा सामाजिक जबाबदारीचा भाग आहे. सावेडी येथील जॉगिंग ट्रॅकच्या भिंती स्वच्छतेचा संदेश पोहोचवणाऱ्या ठरतील, अशी अपेक्षा आहे. आगामी काळात अशा स्वरूपाचे प्रकल्प इतर ठिकाणीही राबविण्यात येतील. या रंगकामामुळे सावेडी परिसरात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे. स्वच्छतेच्या संदेशाने सजलेल्या या भिंती नागरिकांमध्ये स्वच्छतेच्या चळवळीला गती देणार आहेत.

# जोश

शेर की जुवानी

* तसल्ली से पढे होते... तो समझ
में आते हम,
जरूर कुछ पन्ने,
बिना पढे ही पलट दिए होंगे।

गुस्से में कुछ और भी
हसीन लगते हो,
बस यही सोच कर
तुमको खफा रखा है।

ख्वाहिशों का आदी दिल काश
ये समझ सकता,
कि सांस टूट जाती है, एक आस
टूट जाने से।

स्मार्ट टिप्स

## अकाउंट हॅक झालंय?

सध्या अकाउंट हॅक होण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. फेसबुक, इन्स्टाग्रामसारखी सोशल नेटवर्किंग ॲप्स हॅक होऊ शकतात. म्हणूनच आपण काळजी घ्यायला हवी. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी इन्स्टाग्रामची मूळ कंपनी मेटाने नवं व्यासपीठ सादर केलं असून यामुळे युजर्सना हॅक झालेली खाती परत मिळवता येणं शक्य होणार आहे. इन्स्टाग्रामवर युजर्स बनावट क्रिप्टोकरंसी रिटर्न्सच्या माध्यमातून युजर्सना लुभावण्याचं काम करतात आणि त्याद्वारे त्यांच्या खात्यावर ताबा मिळवतात. इन्स्टाग्राम डॉट कॉम/ हॅक्ड नावाचं हे व्यासपीठ असून त्यावर खातं हॅक झाल्याची तक्रार नोंदवता येऊ शकते. या नव्या व्यासपीठावर खात्याच्या सुरक्षेसंबंधीची सगळी टूल्स उपलब्ध असून या माध्यमातून युजर्सची खाती सुरक्षित ठेवणं शक्य होणार आहे.

सोशल मीडिया

## रेकॉर्ड करा व्हॉट्स ॲप कॉल




आपल्याला व्हॉट्स ॲपवरील कॉल रेकॉर्ड करण्याची गरज भासते. पण हा कॉल कसा रेकॉर्ड करायचा हे कळत नाही. पण व्हॉट्स ॲप कॉलही रेकॉर्ड होऊ शकतो. यासाठी क्यूब कॉल रेकॉर्डर हे ॲप डाउनलोड करा. यानंतर व्हॉट्स ॲप कॉल करा. कॉल सुरू झाल्यानंतर हे ॲप बॅकग्राउंडमध्ये कॉल रेकॉर्डिंग सुरू करेल. कॉल बंद झाल्यानंतर रेकॉर्डिंगही बंद होईल. रेकॉर्ड झालेला कॉल ॲपच्या नोटिफिकेशन बारमध्ये दिसेल. अशा पद्धतीने तुम्ही कामासाठी व्हॉट्स ॲप कॉल करून तो रेकॉर्ड करू शकता.

गॅझेट वर्ल्ड

## पाणी कमी पिताय?

सध्या विविध प्रकारची गॅझेट्स लोकप्रिय झाली आहेत. काही गॅझेट्स ॲप्सच्या मदतीने तुमच्या आरोग्याची काळजी घेतात. तर असंच एक गॅझेट म्हणजे हायट्रेस स्पार्क २. ही एक बाटली आहे. पाणी पिण्याचं महत्त्व तर आपण जाणतोच. ही बाटली ॲपशी कनेक्ट होऊ शकते आणि तुम्ही दिवसभरात किती पाणी प्यायलात याचा हिशेबही ठेवते. म्हणूनच ही बाटली तुमच्याकडे असायला हवी.




सोशल अवेअरनेस

## फोन स्वच्छ करताय?



आपल्या स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अनेक रोगजंतू असू शकतात. कोरोनाकाळानंतर अनेक जण सॅनिटायझरने फोनचा स्क्रीन स्वच्छ करतात. मात्र अशा पद्धतीने फोनचा स्क्रीन स्वच्छ करताना काळजी घ्यायला हवी. अन्यथा तुमचा फोन खराबही होऊ शकतो. स्मार्टफोना स्क्रीन अत्यंत नाजूक अशा घटकांपासून तयार करण्यात आलेला असल्यामुळे अल्कोहोलयुक्त सॅनिटायझरमुळे त्यावरील कोटींग निघू शकतं. याच कोटींगमुळे फोनच्या स्क्रीनचा पाणी तसंच तेलापासून बचाव होता. यासोबतच स्मार्टफोनच्या जॅक्सनाही द्रव पदार्थांनी स्वच्छ करू नये. द्रवामुळे हे जॅक खराब होऊ शकतात.

# थंडीतही सुरू ठेवा व्यायाम



फिटनेस

हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत सकाळी उठून व्यायाम करणं जीवावर येतं. अंगावरचं पांघरून बाजूला करावंसं वाटत नाही. पण तासभर झोपण्यासाठी आपण आपल्या आरोग्याकडे, फिटनेसकडे दुर्लक्ष करतो. एखाद्या दिवशी झोपणं ठीक आहे. पण दररोजचा आळस उपयोगाचा नाही. थंडीच्या दिवसातही स्वत:ला व्यायामासाठी कसं सज्ज करता येईल याबाबतच्या काही टिप्स...

1. थंडीत घराबाहेर पडायचं नसेल तर घरीच व्यायाम करा. योगा, जॉगिंग, डान्स असं काहीही करता येईल. घरच्या घरी करण्यासारखे साधेसोपे व्यायामप्रकार आहेत. हे व्यायाम करून तुम्ही फिट राहू शकता.
2. दररोज एकाच प्रकारचा व्यायाम करून कंटाळा येतो. मग व्यायाम टाळला जातो. व्यायाम एकसुरी होत असेल तर डान्स, जीम, योगा, धावणं असं वैविध्य आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला दररोज व्यायाम करावासा वाटेल.
3. व्यायाम करण्यामागची कारणं टिपून ठेवा. काही जण वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी व्यायाम करतात. आपल्याला व्यायामाची गरज का आहे, त्यामागचा आपला उद्देश काय हे लिहून ठेवलं की तुम्हाला व्यायामाची प्रेरणा मिळेल.
4. व्यायामासाठी एखादा जोडीदार सोबत घ्या. फिटनेसची आवड असणाऱ्या मित्राची किंवा मैत्रिणीची निवड करा. ही मंडळी तुम्हाला व्यायामाची प्रेरणा देतील.

# विक्री हस्तकलेच्या वस्तूंची

स्वयंरोजगार

सध्या हस्तकलेच्या वस्तूंना बरीच मागणी आहे. गृह सजावटीच्या या वस्तू अनेकांना आकर्षित करतात. तुमच्या अंगी अशा वस्तू बनवण्याची कला असेल किंवा हस्तकलेच्या वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला चांगली संधी मिळू शकते. या वस्तू वेबसाईट्सच्या माध्यमातून विकल्या जातात. यासाठी स्वत:ची वेबसाईट तयार करता येईल किंवा ई कॉमर्स वेबसाईट्सवरून या वस्तूंची विक्री करता येईल. हस्तकलेच्या अनोख्या किंवा ॲंटिक वस्तू विकण्याचा व्यवसाय करायच्या विचारात असाल तर या टिप्स उपयोगी पडतील.



- आपल्याकडच्या वस्तू वेगळ्या किंवा ॲंटिक असतील याची खात्री करून मगच त्या विक्रीसाठी उपलब्ध करा. लोकांना काहीतरी वेगळं, हटके हवं असतं. त्यामुळे अशाच वस्तू विका. तसंच झोकून देऊन काम करा.
- आपल्याकडच्या उत्पादनांचे प्रभावी फोटो पोस्ट करा. तसंच या उत्पादनांची माहिती अनोख्या पद्धतीने मांडा.
- सुरूवातीला ठराविक उत्पादनांचीच विक्री करा. वस्तूंची संख्या हळूहळू वाढवा. हस्तकलेच्या वस्तूंचा दर्जा टिकवून ठेवणं गरजेचं आहे. उत्तम आणि दर्जेदार वस्तूंची विक्री केली तरच तुम्ही ग्राहकांना जोडून घेऊ शकता.

# टेस्टी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स

झटपट रेसिपी

दोस्तांनो, एखाद्या संध्याकाळी चटपटीत पण वेगळा पदार्थ खावासा वाटला तर कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स ही डिश बनवून बघा.

*साहित्य :* *दोन बटाटे, एक लाल सिमला मिरची, आल्याचा छोटा तुकडा, थोडी कोथिंबिर, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, अर्धा चमचा जीरं, हिंग, मीठ, पाव चमचा हळद, एक चमचा धने, एक चमचा बडिशेप, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा आमचूर पावडर, अर्धा चमचा गरम मसाला.*

**कृती :** बटाटे सोलून लांब काप करून घ्या. लाल सिमला मिरचीचीही लांब कापून घ्या. आल्याचे छोटे तुकडे करा. एका कढईत ऑलिव्ह ऑईल गरम करून त्यात जीरं घाला. मग हिंग आणि हळद घाला. आल्याचे तुकडे घालून परता. धने आणि बडिशेप कुटून घ्या. आता यात बटाटा आणि सिमला मिरचीचे काप घाला. थोडे शिजू द्या. मग सगळे मसाले आणि मीठ घाला. परतून घ्या. शिजल्यावर वरून कोथिंबिर घाला. मस्तपैकी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स खा.



इस्रोसारख्या संघटना अंतराळात यशस्वी झेप घेत आहेत. आज आपल्याला युवा अंतराळवीरांची गरज आहे. हे अंतराळवीर पुढे भारताचं भविष्य ठरू शकतात. रात्रीच्या निरभ्र आकाशात असंख्य तारे-तारका दिसत असतात. अनेकांना आकाश निरिक्षण करायला आवडतं. यात लहानग्यांची संख्या बरीच जास्त आहे. मात्र ही संधी प्रत्येकाला मिळतेच असं नाही. म्हणूनच अवघ्या २१ वर्षांचा आर्यन मिश्रा अंतराळविषयक प्रयोगशाळा उभारण्यासाठी प्रयत्नशील आहे.



# खगोलशास्त्राच्या प्रेमापोटी

अचिव्हर


आर्यन मिश्रा... अवघ्या २१ वर्षांचा तरुण. आर्यनला भारतभरात ५०० अंतराळविषयक प्रयोगशाळा उभारायच्या आहेत. आर्यनचे वडील पेपर विक्रेता. अशाच एका रात्री आर्यन कुटुंबासोबत गच्चीवर झोपायला आला. ते उन्हाळ्याचे दिवस होते. अवघ्या सात वर्षांच्या आर्यनला आकाशात असंख्य तारे पहायला मिळाले. तो अक्षरश: हरखून गेला. हे तारे मुठीत घ्यावे असं त्याच्या मनात आलं. या आवडीचं रुपांतर छंदात झालं. आकाश निरिक्षणाच्या छंदाने आर्यनला झपाटून टाकलं. इथूनच त्याच्या प्रवासाला सुरूवात झाली. सातवीत असताना त्याला टेलिस्कोपची माहिती मिळाली. टेलिस्कोपमधून आकाश निरिक्षण करणं हा अनोखा अनुभव असतो हे त्याच्या लक्षात आलं. मग त्याने घरच्यांकडे टेलिस्कोपची मागणी केली.

टेलिस्कोप घेऊन देणं आर्यनच्या वडीलांसाठी बरंच खर्चिक होतं. घरच्यांनी समजवायचा प्रयत्न केला. पण आर्यनला आकाश निरिक्षणाच्या वेडाने पछाडून टाकलं. टेलिस्कोपसाठी त्यानेच पैसे जमवायला सुरूवात केली. आर्यन शाळेत चालत जावू लागला. एकवेळचं जेवणही कमी केलं. त्याच्याकडे पाच हजार रुपये साठले, छानशी टेलिस्कोप आर्यनच्या घरात आली. आर्यन फिजिक्स शिकतो आहे. यासोबत अंतराळविषयक प्रयोगशाळेच्या माध्यमातून तो मुलांना अनोख्या सुविधाही उपलब्ध करून देत आहे. त्याच्या प्रयत्नांमुळे अंतराळच शाळेच्या वर्गात अवतरू लागलं आहे.



२०१९ मध्ये त्याने या उपक्रमाला सुरूवात केली. गुजरात, पंजाब, दिल्ली आणि हरयाणा इथल्या पाच शाळांमध्ये आर्यनने आपली प्रयोगशाळा स्थापन केली. यामुळे इथल्या मुलांना अंतराळ संशोधनाची गोडी लागली. या उपक्रमाची दखल केंद्र सरकारनेही घेतली. केंद्रीय विद्यालयांमध्ये या प्रयोगशाळा स्थापन करता येतील का, याबाबत सरकारी अधिकाऱ्यांनी त्याच्याशी चर्चा केली. सूर्यमाला, ग्रह, तारे यांचे काही फोटो पुस्तकात असले तरी मुलांना प्रत्यक्ष अनुभूती घेता आली नव्हती. हीच परिस्थिती बदलावी, असं आर्यनला वाटतं. प्रयोगशाळांच्या माध्यमातून तो नवे खगोल शास्त्रज्ञ घडवतो आहे. त्याला ५०० प्रयोगशाळा सुरू करायच्या आहेत. त्याच्या प्रयत्नांमुळे देशाला नवे खगोल शास्त्रज्ञ मिळतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

# प्रेम का उच्चशिक्षण?



मॅच मेकिंग

माझं एका मुलीवर प्रेम होतं. आमचं तीन वर्षांचं नातं संपलं. पण तिच्याशिवाय मला करमत नव्हतं. मन रमत नव्हतं. तिची खूप आठवण यायची. म्हणून हे नातं पुन्हा जोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तिला संपर्क करत राहिलो. पण तिने. प्रतिसाद दिला नाही. तिच्या बहिणीची मदत घ्यायचं ठरवलं. पण या आघाडीवरही निराशाच हाती आली. मैत्रिणीच्या बहिणीने माझा अपमान केला आणि तिच्या आयुष्यातून निघून जायला सांगितलं. या मुलीकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. माझे वडील आजारी असतानाही तिने संपर्क केला नाही. पण तिच्यावर खूप प्रेम असल्यामुळे हा दुरावा सहन होत नाही. जर्मनीत एमबीएची संधी चालून आली आहे. पण मधल्या काळात या मुलीचं लग्न होऊ शकतं. मग तिला कायमचं गमावून बसेन. काय करू?

उत्तर : मित्रा, तीन वर्ष जपलेलं नातं संपवून नव्याने आयुष्य सुरू करणं खूप कठीण आहे. पण आयुष्यात काही कठोर निर्णय घ्यावेच लागतात. स्वत:च्या भवितव्याचा विचार करावा लागतो. जर्मनीत एमबीए करण्याची संधी सगळ्यांना मिळत नाही. त्यामुळे ही संधी सोडू नकोस. शिक्षणामुळे तुझं भवितव्य घडणार आहे. त्यातच या मुलीकडून तुला कोणताही प्रतिसाद मिळत नसताना तिच्यासाठी आयुष्यभराची संधी सोडण्यात अर्थ नाही. एखाद्या व्यक्तीसोबत आयुष्य घालवणं यालाच प्रेम म्हणत नाहीत. प्रेम ही भावना खूप उदात्त आहे. प्रिय व्यक्तीच्या आनंदात आनंद मानणं हे सुद्धा प्रेमच आहे. त्यामुळे जर्मनीला जाण्याचा निर्णय घे. हेच तुझ्यासाठी योग्य आहे. योग्य वेळी योग्य व्यक्ती तुझ्या आयुष्यात येईल.

# निवड पर्यावरणपूरक कपड्यांची



फॅशन पॅशन

वस्त्रोद्योगामुळे बरंच प्रदूषण होतं. पर्यावरणाची हानी होते. आता आपल्या कपाटातली एक जीन्स तयार करण्यासाठी काही लीटर पाणी वापरलं जातं. जीनचं कापड धुण्यासाठी १० ते १५ लीटर पाणी लागतं. जीनची पॅंट किंवा जॅकेट तयार करण्याच्या प्रक्रियेत जवळपास पाच हजार लीटर पाण्याचा वापर होतो. वस्त्रोद्योग पर्यावरणपूरक व्हावा, यासाठी प्रयत्न होत असले तरी ते अपुरेच आहेत. म्हणूनच ग्राहकांनीही थोडे प्रयत्न करायला हवेत. आपलं कपड्यांचं कपाट पर्यावरणपूरक असावं, यासाठी काय करता येईल हे जाणून घेऊ.

- तुमच्याकडे कपड्यांच्या जास्त जोड्या असायला हव्यात. त्यातही जीन्सची संख्या अधिक असणं गरजेचं आहे. वर्षभरात तीन ते चार जोड्या कपडे वापरण्याऐवजी आठ ते नऊ जोड्या खरेदी करा. त्यातही जीन्स अधिक प्रमाणात खरेदी करा. जास्त कपडे अधिक काळ टिकतात. तसंच कमी वेळा धुतले जातात. शिवाय धुतलेले कपडे पुन्हा धुण्याआधी दोनदा वापरता आले तर उत्तम.
- जीन्स वारंवार धुवू नका. जीन्स नऊ ते दहा आठवडे न धुता वापरता येईल. वापरलेली जीन्स काही काळ उन्हात ठेवा. यामुळे जीन्सला वास येणार नाही.
- जीन्सची नीट देखभाल करावी लागते. जीन्स उसवली असेल तर ती लगेच शिवून घ्यायला हवी. एखाद्या चांगल्या बुटिकमध्ये जाऊन जीन्सची डागडुजी करता येईल. यामुळे तुमची जीन्स बराच काळपर्यंत टिकून राहिल.
- रस्त्यावर स्वस्तात मिळणारे कपडे अजिबात विकत घेऊ नका. या कपड्यांचा दर्जा फार चांगला नसतो. त्यामुळे हे कपडे लवकर खराब होतात आणि कचऱ्याच्या डब्यात जातात. यामुळे कचऱ्यात भरच पडते.
- कपडा उत्पादक कंपन्या शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करतात. याबाबतची माहिती कपड्यावर लावण्यात आलेल्या लेबलवर लिहिलेली असते. त्यामुळे ही लेबल्स वाचून मगच कपडे खरेदी करा.



# सफर कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाची

थंडीच्या दिवसात भटकंती करणं हा धमाल अनुभव असतो. बोचरे वारे, हुडहुडी भरवणारी थंडी फिरण्याचा आनंद द्विगुणीत करतात. थंडीच्या दिवसात फिरण्यासाठी योग्य ठिकाणाच्या शोधात असाल तर कुद्रेमुखची निवड करा. तुंग, भद्रा आणि नेत्रावती या दक्षिण भारतातल्या प्रमुख नद्या. या नद्यांचं उगमस्थान कुद्रेमुखमध्ये आहे. कुद्रेमुखचं राष्ट्रीय उद्यान अनेक अर्थांनी अनोखं आहे. या परिसरात ट्रेकिंगही करता येतं. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात इथे मस्त भटकंती करता येते.

भटकंती

कुद्रेमुख म्हणजे घोड्यासारखं मुख. कुद्रेमुख परिसरातल्या डोंगररांगांमध्ये घोड्याचा तोंडाचा भास होत असल्यामुळे या भागाला कुद्रेमुख हे नाव पडलं. या डोंगरांमधल्या गुहेत देवी भगवतीचं मंदिरही आहे. कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानात वाघ, बिबट्या, हत्ती, हरणं, माकडं तसंच इतर काही प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात. वन्यजीवनाच्या छायाचित्रणाची आवड असेल तर कुद्रेमुखसारखं उत्तम ठिकाण नाही. कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाच्या आसपासच्या गावांमध्ये होम स्टेची सुविधा आहे. या होम स्टे दरम्यान तुम्ही इथल्या स्थानिक संस्कृतीची ओळख करून घेऊ शकता.

इथे १८ किलोमीटरचा ट्रेक आहे. हा ट्रेक पूर्ण करून संध्याकाळी घरी येता येईल. होम स्टे दरम्यान अस्सल कानडी भोजनाचा आस्वादही घेता येईल. या दरम्यान तुम्ही गाईडही घेऊ शकता. बंगळूरू किंवा मंगळूरहून कुद्रेमुखला जाता येईल. मग कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यानाला नक्की भेट द्या.



# विजेता करंडक स्पर्धेच्या रंगलेल्या अंतिम सामन्यात दोन्ही संघ ठरले संयुक्त विजेते

नगर – अंतिम सामन्यात दोन्ही संघाची समसमान धावसंख्या झाल्याने आधी सामना टाय झाला...मग सुपर ओव्हरमध्येही दोन्ही संघांची धावसंख्या समान झाली...त्यामुळे निकालासाठी बॉल आऊटचा पर्याय अंमलात आला...पण प्रचंड तणावात असलेल्या दोन्ही संघांतील एकाही गोलंदाजाला स्टम्प उडवता आलाच नाही, त्यामुळे विजेता करंडक स्पर्धेच्या रंगलेल्या अंतिम सामन्यात दोन्ही संघ ठरले संयुक्त विजेते. शेवटी रेफ्रींच्या निर्णयानुसार अंतिम लढतीतील क्वॉलिटी वॉरियर व एमबी स्ट्रायकर्स या दोन्ही संघांना संयुक्त विजेतेपद दिले गेले. स्पर्धेच्या बक्षीस वितरणास आलेला आयपीएल प्लेअर मुकेश चौधरीही अंतिम सामन्याचा थरार पाहून अचंबित झाले व दोन्ही संघांतील खेळाडूंची भेट घेऊन त्यांच्या चुरशीच्या लढतीचे कौतुक त्यांनी भरभरून केले. आपल्या क्रिकेट जीवनातील हा अदभूत क्षण असल्याचे गौरवोदगारही त्यांनी यावेळी व्यक्त केले. गेल्या जानेवारी महिन्यात बेंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर भारत विरुद्ध अफगाणिस्तान मध्ये झालेल्या टी२० सामन्याची आठवण यावेळी उपस्थितांना आली.

विजेता क्रिकेट क्लबच्या वतीने जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे माजी सेक्रेटरी (स्व.) संजय बोरा यांच्या स्मरणार्थ नगरच्या वाडीयापार्क मैदानावर मागील १० दिवसापासून सुरु असलेल्या स्पर्धेतील अंतिम सामना शेवटपर्यंत रोमांचक ठरत रंगला. अंतिम सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना क्वालिटी संघाने निर्धारित षटकात ६५ धावा केल्या. त्यांचा पाठलाग करताना एमबी संघालाही संघर्ष करावा लागला. सामना जिंकण्यासाठी अंतिम षटकात त्यांना ६ चेंडूत ७ धावा हव्या असताना त्यांना केवळ सहाच धावा करता आल्याने सामना बरोबरीत सुटला. अंतिम सामना असल्याने निकाल लागणे महत्त्वाचे होते. त्यामुळे सुपर ओव्हर खेळवली गेली. त्यात एमबी संघाने प्रथम फलंदाजी करताना एका षटकात १४ धावा केल्या. त्यांचा पाठलाग करताना क्वालिटी संघालाही सहा चेंडूत १४ धावाच करता आल्या. सुपर ओव्हरही टाय झाल्याने शेवटचा पर्याय बॉल आऊटचा निवडला गेला. यात दोन्ही संघांना ८-८ चेंडू गोलंदाजीसाठी दिले गेले. पण दोन्ही संघांच्या गोलंदाजांनी टाकलेल्या चेंडूत एकदाही स्टम्प उडाला नाही. दोन्ही संघांचे हे यशापयश मैदानावर दोन्हीकडचे खेळाडू एकीकडे तणावात व दुसरीकडे जल्लोषात अनुभवत होते. सामन्याचा निकालच लागत नसल्याचे पाहून अखेर संयोजकांनी दोन्ही संघांना संयुक्त विजेतेपद घोषीत केले व दोन्हीकडच्या खेळाडूंसह क्रिकेट रसिकांनीही जल्लोष सुरू केला.



विजेता करंडक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या एमबी स्ट्रायकर्स व क्वॉलिटी वॉरियर या दोन्ही संघाना विजेता करंडक प्रदान करताना आयपीएल खेळाडू मुकेश चौधरी. समवेत नरेंद्र फिरोदिया, श्रीमती मधु बोरा व स्पर्धेचे संयोजक विजेता क्लबचे सदस्य.

## सुपर ओव्हर व बॉल आऊटचा थरार

दोन्ही संघ तुल्यबळ असल्याने शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या या सामन्यातील विजेत्या दोन्ही संघांना आयपीएल सीएसके संघाचा जलदगती गोलंदाज मुकेश चौधरी या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूच्या हस्ते 'विजेता' करंडक प्रदान करणात आला.

पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक नरेंद्र फिरोदिया होते. यावेळी राजेंद्र चोपडा, श्रीमती मधु बोरा, राजेश भंडारी, अभय श्रीश्रीमाळ, विकी मुथा, प्रनील मुनोत, आदेश चंगेडीया, ईश्वर बोरा, अभिजीत गांधी, सचिन मुनोत, प्रशांत बोकारिया, अभिनंदन भन्साळी, वरुण चोपडा, परेश गांधी, अतुल शिंगवी, आदित्य इंदाणी, अमित लड्डा, आनंद चंगेडीया, कुणाल डुंगरवाल, आनंद गांधी, सुमित लोढा, आनंद गुगळे, निखिल लुणिया, रोनक मुनोत आदींसह स्पर्धा संयोजक विजेता क्लबचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी मुकेश चौधरी म्हणाला, नगरसारख्या छोट्या शहरात एव्हढ्या भव्य व आकर्षक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पाहून अचंबित झालो आहे. अखेरपर्यंत रंगलेला रोमांचकारी अंतिम सामना पाहून मजा आली. अशा चांगल्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन नगरमध्ये करत राहा.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, नगरमध्ये विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेमुळे क्रिकेटचे चांगले वातावरण निर्माण झाले आहे. आयपीएल स्पर्धेसारखेच भव्यदिव्य स्पर्धेचे आयोजन नगरमध्ये विजेता क्लबने केले आहे. अशा चांगल्या स्पर्धेला कायम सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी अंतिम सामन्याचा सामनावीर आनंद बलदोटा, स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज सार्थक भंडारी, उत्कृष्ट गोलंदाज प्रवीण शिंगवी, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक तनिष छल्लानी व स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू आनंद बलदोटा आदींना ट्रॉफी व रोख पारीतोषिके देण्यात आली.



अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमनपदी निखिल नहार यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

# अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमनपदी निखिल नहार

नगर – अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या व्हाईस चेअरमनपदी निखिल नहार यांची संचालक मंडळांनी एकमताने निवड करण्यात आली. यासाठी सूचक व्हाईस चेअरमन डॉ. भूषण अनभुले तर अनुमोदन संचालक सुजित बेडेकर यांनी दिले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांनी काम पाहिले.

यावेळी बँकेचे चेअरमन सीए गिरीश घैसास, माजी व्हाईस चेअरमन डॉ. भूषण अनभुले, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, डॉ. विजयकुमार भंडारी, अशोक कानडे, सुजित बेडेकर, संजय घुले, शिवाजी कदम, जयंत येलुलकर, दत्तात्रय रासकोंडा, संचालिका रेश्मा आठरे, स्वाती कांबळे, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, सीनियर ऑफिसर प्रकाश वैरागर, जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी विक्रम मुटकुळे आदी उपस्थित होते

यावेळी नूतन व्हाईस चेअरमन निखिल नहार यांना बँकेचे अध्यक्ष सीए गिरीश घैसास व संचालक मंडळांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी निखिल नहार म्हणाले की, गिरीश घैसास व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली बँकेची वाटचाल प्रगतीकडे सुरू आहे. माझ्यावर विश्वास ठेवून मला व्हाईस चेअरमन पदावर काम करण्याची संधी दिली असून, त्या पदाच्या माध्यमातून बँकेची आर्थिक परिस्थिती भक्कम करण्यासाठी प्रयत्न करीन व मिळालेला पदाला न्याय दिला जाईल. अहमदनगर शहर सहकारी बँकेचा नगर जिल्ह्यात असलेला नावलौकिक वाढवण्यासाठी प्रयत्न करीन, असे ते म्हणाले

# ग्राहकांचे प्रश्न समन्वयातून सोडवा

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ



जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ. समवेत जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी.

नगर – ग्राहकांच्या असलेल्या अडी-अडचणी व प्रश्न जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून समन्वयाने सोडविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, दैनंदिन जीवनामध्ये ग्राहकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ग्राहकांच्या विद्यूत विषयक समस्या सोडविण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर ऊर्जामित्र बैठकांचे आयोजन करण्यात यावे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये लोंबकळणाऱ्या विद्यूत तारांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने या तारांची तातडीने दुरुस्ती करुन घेण्यात यावी. अहिल्यानगर शहरामध्ये गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केल्या.

जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णालयामध्ये रुग्णहक्क सनद तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेबाबतचे फलक लावण्यात यावेत. ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांचे अपघात टाळण्यासाठी प्रत्येक वाहनांवर रिफ्लेक्टर बसविण्यात यावेत. रिफ्लेक्टर न बसविलेल्या वाहनांवर कारवाई करण्याच्या सुचनाही श्री. सालीमठ यांनी यावेळी केल्या.

बैठकीस अशासकीय सदस्य अतुल कुऱ्हाडे, विलास जगदाळे, रणजित श्रीगोड, गजेंद्र क्षीरसागर, बाबासाहेब भालेराव, डॉ. मंगला भोसले, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. विलास सोनवणे, डॉ. गोरख बारहाते, प्रकाश रासकर उपस्थित होते.

# 'आदर्श दृष्टी मित्र पुरस्कार' जालिंदर बोरुडे यांना जाहीर

### नवी दिल्ली येथे होणार २५ जानेवारीला सन्मान



नगर – नवी दिल्ली येथील महात्मा गांधी मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा आदर्श दृष्टी मित्र पुरस्कार अहिल्यानगर येथील फिनिक्स फाउंडेशनचे अध्यक्ष नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष अभिजीत पानसे यांनी दिली.

महात्मा गांधी मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्काराने गौरविण्यात येते. अहिल्यानगर येथील नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांनी ३० वर्षापासून फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिर व नेत्र शिबिर आयोजित करून विविध स्तरातील अनेक गोरगरिबांना मोतीबिंदू, काचबिंदू व नेत्रदानच्या शस्त्रक्रिया घडवून आणले आहेत. या सेवेच्या माध्यमातून दृष्टीदोष असलेल्या रुग्णांना नवदृष्टी देण्याचे कार्य निस्वार्थ भावनेतून ते करत आहे.

आरोग्य शिबिराच्या माध्यमातून हजारो वंचित दीन-दुबळ्या घटकातील रुग्णांना निस्वार्थ भावनेतून ही सेवा दिली जात आहे. बोरुडे यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना गौरवार्थी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. पुरस्कार वितरण २५ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे मान्यवरांच्या हस्ते केले जाणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव गोपाल माजगांवकर यांनी दिली.

# जुनी पेन्शन व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यासाठी तो शासन निर्णय निर्गमीत व्हावा

नगर – १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर शंभर टक्के वेतन अनुदान प्राप्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याप्रकरणी तसेच राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनांच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू होण्यासाठी मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमीत करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. मागणीचे निवेदन माजी शिक्षक आमदार तथा परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार तसेच शिक्षण सचिव कुंदन मॅडम यांना दिले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर शंभर टक्के वेतन अनुदान प्राप्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत तपासणी करण्याकरिता शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय १३ ऑगस्ट २०२४ अन्वये तपासणी समिती गठीत करण्यात आली. सदर तपासणी समितीला या विषयाबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार तपासणी समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करणे अत्यावश्यक व निगडीचे असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.


राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्याची शिफारस शासनास करण्याबाबत शासन निर्णय ३१ जून २०१९ अन्वये अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली होती. अभ्यास गटाची अंतिम बैठक ६ मार्च २०२० रोजी बालचित्रवाणी कार्यालय पुणे येथे घेण्यात आली. सदर अंतिम बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार अभ्यास गटाचा अंतिम अहवाल शिफारशीसह शासनास ८ मे २०२० रोजी शासनास सादर करण्यात आला. शासनाने अभ्यास गटाचा अंतिम अहवाल जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून शिक्षकांना तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेपासून वंचित ठेवले असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

शिक्षक व शिक्षकेतरांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवलेल्या अन्यकारक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड संताप निर्माण झाला आहे. याबाबत मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमीत करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली असल्याचे बाबासाहेब बोडखे यांनी म्हंटले आहे.



न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात एआयसीटीई अंतर्गत बीबीए आणि बीबीए (आयबी) विभागात नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ २०२४ चे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# नगर मल्लखांब व योगा सेंटरच्या खेळाडूंची 'शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धे'साठी निवड



नगर – उज्जैनमध्ये प्रदेश येथे १३ डिसेंबर पर्यंत होणाऱ्या शालेय राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेसाठी अहमदनगर मल्लखांब व योगा सेंटरच्या एकूण ३ खेळाडूंची निवड झाली आहे. १४ वर्षाखालील गटात विहान कालीप्रसाद चंद्रात्रे व १७ वर्षाखालील गटात दिग्विजय श्रीकांत निंबाळकर व देवदत्त विशाल चोरगे यांची सीबीएससी संघात निवड झाली आहे. हे खेळाडू सुमारे ४ वर्षांपासून मल्लखांबाचा सराव करतात. या खेळाडूंना संस्थेचे मुख्य प्रशिक्षक अनिकेत सुसरे व प्रशिक्षिका प्राजक्ता दळवी यांचे मार्गदर्शन लाभले.

# न्यू आर्टस् कॉलेजच्या बीबीए व बीबीए (आयबी) विभागात नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ २०२४' चे उद्घाटन

नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात एआयसीटीई अंतर्गत बीबीए आणि बीबीए (आयबी) विभागात नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ९ ते १३ डिसेंबर या दरम्यान दीक्षारंभ २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात विभागाचे विभाग प्रमुख डॉ. मंगेश वाघमारे यांनी २००४-२००५ साली १३ विद्यार्थ्यांवर सुरू झालेला प्रवास आज ५०० विद्यार्थ्यांपर्यंत येऊन ठेपला आहे. तसेच विद्यार्थ्यांनी केलेली सर्व क्षेत्रातील प्रगती व संस्थेने दिलेले पाठबळ याचा उहापोह केला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उमटवलेला ठसा विभागाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा ठरल्याचे विषद केले. कॉमर्स विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीशी महाविद्यालय कायम उभे असेल असे नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सागडे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच मिडियाचा वापर सकारात्मक दृष्टीने करण्याचे आवाहन केले. त्यांनी महाविद्यालयातील कल्चर, कोड ऑफ कंडक्ट आणि ट्रॅडिशन बद्दल विद्यार्थ्यांना संबोधले. अभ्यासात सातत्य ठेवून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे व एक चांगले व्यक्तिमत्त्व म्हणून नवनवीन उपक्रम हाती घेण्याचे आवाहन केले.

सलग पाच दिवस चालणाऱ्या या दीक्षारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कम्युनिकेशन स्कील, स्ट्रेस मॅनेजमेंट, व्यक्तिमत्व विकास, व्यवस्थापन कौशल्य या विविध विषयावर तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण २०२०, ग्रंथालयातील योजना, राष्ट्रीय छात्र सेना, युवा महोत्सव, स्पर्धा परीक्षा, स्टुडंट प्लेसमेंट, करिअर कौन्सलींग, शारीरिक शिक्षण असे विविध उपक्रमांची माहिती नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.

उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर प्रा. गिरीश कुकरेजा यांनी ताणतणावाचे व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले तसेच दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. राजेंद्र परदेशी यांनी व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधित केले.

या कार्यक्रमासाठी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, विभागातील प्राध्यापक डॉ. सतीश जगताप, डॉ. राहुल थोरात, प्रा. अनिता पेटकर, प्रा. अभिजीत सातभाई, प्रा. नम्रता ठाकर, प्रा. शामल जाधव व विद्यार्थी उपस्थित होते.



## श्रीमती रेवाताई कुलकर्णी यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

अ.ए सोसायटी न्यू इंग्लिश स्कूलच्या माजी अध्यापिका श्रीमती रेवाताई कुलकर्णी (आई) यांच्या ८५ व्या वाढदिवसांच्यानिमित्ताने अभिष्टचिंतन करताना आंतरराष्ट्रीय चित्र – शिल्पकार प्रमोद कांबळे, जायंटस् इंटरनॅशनलचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, उद्योगपती वसंत बोरा, संजय झिंजे, क्रीडापटू विश्व हिंदू परिषदचे विभाग प्रमुख सुनील खिस्ती सर, इंजिनियर दीपक मुथा, उदय विटणकर, घनशाम दिवाणी, प्रवीण खंडेलवाल, शाह, कैलास ढोरे, यशपाल भाटे, डॉ.शिरीष, डॉ.संगीता, डॉ. साहिल कुलकर्णी आदी.

